रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २७६
www.ramprahar.com

गुरुवार, २४ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

पनवेलमध्ये मुस्लिमांकडून आतंकवाद्यांचा निषेध/२
दुचाकींच्या वाढत्या चोऱ्यांमुळे वाहनमालक त्रस्त/३
अलिबागमध्ये जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा/८

## केंद्र सरकारकडून पाकिस्तानविरोधात पाच मोठे निर्णय



**नवी दिल्ली :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी सीसीएस म्हणजे कॅबिनेट सुरक्षा सेक्युरिटीची बैठक बुधवारी (दि.२३) झाली. परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेत माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्ताविरोधात पाच मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द करण्यात येत आहे तसेच भारतातील पाकिस्तान दुतावासाच्या अनुषंगानेदेखील महत्त्वाचा निर्णय या बैठकीत झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानची व्यापाराच्या दृष्टीने कोंडी करण्याची रणनीती भारताने आखली आहे.

# देशभरात हळहळ! दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

## पनवेलमधील दिलीप देसले यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जम्मू काश्मीर येथील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये नवीन पनवेल सेक्टर १२ येथील दिलीप देसले हेदेखील मयत झाले. बुधवारी (दि.२३) सायंकाळी त्यांचे पार्थिव पनवेलमध्ये आणण्यात आले. त्या वेळी देसले कुटुंबीयांनी टाफो फोडला होता. अंत्यविधीवेळी राज्याचे मंत्री दादा भुसे, आमदार प्रशांत ठाकूर, तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, कामोठे येथील सुबोध पाटील आणि माणिक पाटील हे पती-पत्नी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना श्रीनगर येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती ठीकठाक आहे.

या घटनेची माहिती मिळताच पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी शहीद दिलीप देसले यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना सांत्वना दिली. तसेच, जखमी सुबोध पाटील आणि माणिक पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

प्राप्त माहितीनुसार, पनवेलमधून निसर्ग ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून अमरनाथ यात्रेसाठी पर्यटक रवाना झाले होते. २१ ते ३० एप्रिल या दरम्यान ही यात्रा आयोजित करण्यात आली होती. यात्रेकरू पहलगाम येथे पोहचल्यानंतर मंगळवारी अज्ञात दहशतवाद्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. दहशतवाद्यांनी प्रवाशांना त्यांचे नाव आणि धर्म विचारून गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात दिलीप देसले यांचा मृत्यू झाला, तर माणिक पाटील आणि सुबोध पाटील हे जखमी झाले. माणिक पाटील या कस्टम विभागात कार्यरत होत्या आणि नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या होत्या.

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवादी हल्ल्यामुळे पहलगाम येथे काही पर्यटक अडकले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे यात्रेकरू आणि त्यांच्या नातेवाईकांना माहिती देण्यासाठी श्रीनगर येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मदतीसाठी ०१०१९४- २४६३६५१/ २४५७५४३ /२४८३६५१, ७७८०८०५१४४ /७७८०९३८३९७/७००६०५८६२३ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यातील जे नागरिक पहलगाम येथे अडकले आहेत किंवा ज्यांच्या नातेवाईक तिथे आहेत, त्यांनी तात्काळ रायगड जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी केले आहे. यासाठी ०२१४१-२२२११८/२२२०९७ आणि ८२७५१५२३६३, ९७६३६४६३२६ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. **(पान २ वर..)**

## मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश

### महाराष्ट्रातील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखांची मदत



**मुंबई :** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला. या मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारच्या वतीने पाच लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच जखमींनाही अर्थसाहाय्य करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.२३) सांगितले. पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांचे मृतदेह परत आणले जाणार आहेत. यासाठी राज्य सरकारच्या वतीने विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही जबाबदारी काही मंत्र्यांवर सोपविण्यात आली

### आपत्कालीन कार्यकेंद्र सक्रिय

**मुंबई :** जम्मू व काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवरील झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील बाधित नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्यकेंद्र (मंत्रालय नियंत्रण कक्ष) येथील कक्षात दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन संचालक सतीशकुमार खडके यांनी दिली.

## तीन दहशतवाद्यांची ओळख पटली

### गोळीबार करणाऱ्यांचे छायाचित्र जारी



**पहलगाम : वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममधील बैसरन येथे मंगळवारी (दि.२१) दुपारी २.३० वाजता दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या भ्याड हल्ल्यात निष्पाप २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. सुरक्षा यंत्रणांनी काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यामागील संशयित दहशतवाद्यांचे छायाचित्र तसेच रेखाचित्रे जारी केली आहेत. आसिफ फुजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी या हल्ल्यात तीन दहशतवाद्यांची ओळख पटली आहे.

गुप्तचर विभागाने म्हटले आहे की, चार ते पाच दहशतवादी मागील एक महिन्यापासून पहलगाम परिसरात सक्रीय होती. दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा (एलईटी) ची शाखा असलेल्या 'द रेझिस्टन्स फ्रंट'च्या दहशतवाद्यांनी बैसरनमध्ये पर्यटकांवर एके-४७ ने अंदाधूंद गोळीबार केला. गुप्तचर विभागाच्या सूत्रांनी म्हटलं आहे की, हल्ल्याच्या काही दिवस आधी खोऱ्यात घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्यांमध्ये हल्लेखोरांचा समावेश होता.

### डोंबिवलीतील तीन पर्यटकांचा हल्ल्यात मृत्यू

**ठाणे :** जम्मू-काश्मिरमधील पहलगाममध्ये मंगळवारी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ला केला. दहशतवाद्यांच्या गोळीबारात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये महाराष्ट्रातील डोंबिवलीतील तीन पर्यटकांचाही समावेश आहे.

डोंबिवली शहरातील नवापाडा, पांडुरंग वाडी आणि नांदिवली परिसरात राहणाऱ्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांचा मृत्यू झाला आहे.



**पनवेल :** जम्मू-काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शहरात नागरिकांनी रॅली काढली होती. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी दहशतवादविरोधी घोषणा दिल्या.



**मुंबई :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले नवीन पनवेल येथील रहिवासी दिलीप देसले यांचे पार्थिव बुधवारी दुपारी विशेष विमानाने मुंबईत आणण्यात आले. मुंबई विमानतळावर भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा, गुलाबराव पाटील, दादा भुसे, योगेश कदम, खासदार श्रीकांत शिंदे, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अनेक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी पुष्पहार अर्पण करून दिलीप देसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## निवडक

### मेंढपाळांच्या खात्यात ७.३३ कोटी चराई अनुदान जमा

**मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने धनगर व तत्सम समाजातील ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

### पुन्हा एकदा महाराष्ट्रात देशातील सर्वाधित तापमान


**चंद्रपुर :** ब्रह्मपुरी येथे बुधवारी तब्बल ४५.६ अंश सेल्सियल तापमानाची नोंद झाली आहे. देशात सर्वाधिक तापमान आहे. यानंतर ओडिशा जिल्ह्यातील झरसुगुडा येथे ४५.४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. दोन दिवसांपूर्वीही चंद्रपुरात ऐवढेच तापमान होते.



**उलवे नोड : येथील इनव्हिक्टा कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी उपसरपंच अमर म्हात्रे, निलेश भगत, संतोष भगत, गुलाब भगत, रमेश घरत, श्रीधरशेठ भगत, गोपाळशेठ भगत, भूषण रतन भगत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. रतनशेठ भगत, ॲड. संतोष पाटील, गोविंद गाजोरा आणि दिपेश गाजोरा यांची हे कार्यालय सुरू केले असून त्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

## नवी मुंबईकरांचा दक्षिण मुंबईत होणार थेट प्रवास

### वरळी-शिवडी कनेक्टरला कोस्टल रोडवर अंडरपास





**मुंबई : प्रतिनिधी**

वरळी-शिवडी कनेक्टरला जोडणाऱ्या मुंबई सागरी किनारा मार्गावरील अंडरपासचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या दहा दिवसांत हा अंडरपास पूर्णपणे तयार होईल, ज्यामुळे नवी मुंबईकरांना दक्षिण मुंबई आणि वांद्रे येथे थेट प्रवास करणे शक्य होणार आहे. तसेच वरळी-शिवडी कनेक्टर पूर्ण झाल्यावर प्रवासाचा वेळ आणखी कमी होणार आहे.

मुंबईच्या दक्षिण टोकापासून उत्तर मुंबईच्या टोकापर्यंत म्हणजेच, नरिमन पॉइंटपासून दहिसरपर्यंत वेगाने पोहोचण्यासाठी मुंबई किनारा रस्ता प्रकल्प टप्प्याटप्प्याने बांधण्यात येत आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यांतर्गत सागरी किनारा मार्ग हा शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल) ते वरळी वांद्रे सी लिंकच्या टोकापर्यंत उभारण्यात आला आहे. त्याची लांची १०.५८ किमी आहे. या मार्गावरून मार्च २०२४ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत ५० लाखांपेक्षा जास्त वाहनांनी ये-जा केली आहे.

या मार्गावरून दररोज सरासरी १८ ते २० हजार वाहनांचा प्रवास सुरू असतो. सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत वाहनचालकांसाठी मार्ग खुला आहे. या मार्गाद्वारे आणखी एक दिलासा वाहनचालकांना मिळणार आहे. या मार्गाला वरळी-शिवडी कनेक्टरची जोड देण्यात आली आहे. 'एमएमआरडीए कडून वरळी-शिवडी कनेक्टर बांधला जात आहे. हा कनेक्टर सागरी किनारा मार्गाला जोडण्यासाठी किनारा मार्गावर अंडरपास तयार करण्यात आला आहे.

या अंडरपासमध्ये दोन मार्गिका आहेत. यातील एक मार्गिका मरिन ड्राइव्ह दिशेने जाते. तर, दुसरी मार्गिका सागरी किनारा मार्गाला जोडून वांद्रेच्या दिशेने जाईल. हा अंडरपास ६० मीटरचा आहे. या अंडरपासमध्ये पदपथही तयार करण्यात आला आहे. त्यामुळे नवी मुंबईतून शिवडी न्हावा शेवामार्गे येऊन पुढे मुंबई सागरी किनारा मार्गावरूनही जाता येणार आहे. वरळी-शिवडी कनेक्टरचे काम ६५ टक्के पूर्ण झाले आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी लागणार आहे.

**प्रभादेवी, वरळीला जाण्याचीही सुविधा**

अंडरपास सुरू होताच सुरुवातीला प्रभादेवी, वरळीला जाण्यासाठीही या अंडरपासचा वापर करता येणार आहे. सागरी किनारा मार्गाचा विस्तार पुढे वर्सोवा- दहिसर-भाईंदरपर्यंत होत आहे. त्यामुळे भविष्यात नवी मुंबईहून या अंडरपासच्या मदतीने सागरी किनारा मार्गावरून वांदे, वर्सोवा, दहिसर आणि पुढे सुसाट प्रवास करणे शक्य होणार आहे.

## महिलेवर अत्याचारप्रकरणी हमरापूरचे सरपंच अटकेत

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हमरापूर गावचे सरपंच राकेश दाभाडे यांनी एका महिलेवर १५ वर्षे अत्याचार केल्याप्रकरणी असहाय्य झालेल्या फिर्यादी महिलेने शेवटी पेण पोलिसांत तक्रार दाखल केली आहे याप्रकरणी पोलिसांनी आकाश दाभाडे यास अटक केली आहे

याबाबत माहिती अशी की हमरापुर गावचे सरपंच राकेश दाभाडे यांनी सन २०१० मध्ये फिर्यादी महिलेसोबत प्रेमाचे नाटक करून तिच्याबरोबर अनेकवेळा शारीरिक संबंध ठेवले.

यातील फिर्यादी ही बुरुड समाजाची असल्याने लग्नास नकार देऊन फिर्यादीचे मोबाईलमध्ये काढलेले अश्लील फोटो याचा फायदा घेत फिर्यादी हिला भेटण्यास बोलावून तिने नकर दिल्यास ते फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर पेणमध्ये अनेक ठिकाणी बोलावून १२ एप्रिल २०२५ पर्यंत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले असल्याने फिर्यादीने ही माहिती आरोपीच्या पत्नीस सांगूनदेखील आरोपीच्या पत्नीने फिर्यादीला तू खालच्या जातीची आहेस तुला काय करायचे ते कर असे असे बोलून अपमानास्पद वागणूक दिली.

यामुळे फिर्यादीने पेण पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात तक्रार दाखल केली असून ह्या प्रकरणी पेण पोलीस ठण्यात भादवि कलम ६४, ६४, (२), ३, (५), अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे कलम (३),(आर),, ३(१) (एस) ३ (१) (डब्ल्यू) (i) (ii) नुसार ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलिस उपविभागीय अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप बागुल हे करीत आहेत.

## मुख्यमंत्री सहायता निधी सेवा आता व्हॉट्सॲपवर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री सहायता निधी आजार व रक्कम अवलोकन समितीच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. या वेळी ५ डिसेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत ७,६५८ रुग्णांना ६७.६२ कोटींची मदत देण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

मुख्यमंत्री म्हणाले, मुख्यमंत्री सहायता निधीची सेवा नागरिकांसाठी अधिक सुलभ व्हावी यासाठी ती व्हॉट्सपवर उपलब्ध करून द्यावी यासाठी मेटा कंपनीसोबत करार करण्यात आला आहे.

# धर्मादाय रुग्णालयांवर नियंत्रणासाठी विशेष तपासणी पथकाची घोषणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या आढावा बैठकीत धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन रुग्णांना मोफत सेवा न मिळाल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली. यासाठी धर्मादाय आयुक्त, आरोग्य विभाग व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांच्या समन्वयातून विशेष तपासणी पथक तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

धर्मादाय रुग्णालयांनी १०% खाटा निर्धन आणि १०% दुर्बल घटकासाठी राखीव ठेवणे बंधनकारक असून, अनामत रक्कम न घेता तातडीची सेवा देणे आवश्यक आहे. रुग्णालयांनी शिल्लक खाटा, उपचारांची माहिती ऑनलाईन प्रणालीत भरावी यासाठी सक्तीचे नियम लागू करण्याचे आदेश देण्यात आले.

प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात फलक व डॅशबोर्डद्वारे माहिती जाहीर करण्याची व्यवस्था करावी, जिल्हास्तरीय समित्या स्थापन करून देखरेख ठेवावी आणि माहिती न भरलेल्या रुग्णालयांवर कारवाई करावी असेही निर्देश दिले. २०२३ पासून सुरू असलेल्या धर्मादाय मदत कक्षामार्फत आजवर ७,३७१ रुग्णांना २४.५३ कोटींचा उपचार निधी वितरित करण्यात आला, अशी माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातर्फे देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी आणि डॉक्टर बैठकीला उपस्थित होते.

## किर्तनाएवढे समाधान कधी मिळाले नाही –मंत्री आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**



तीन दिवस चालत असलेला वरदायी कीर्तन अमृत आज यशस्वीरित्या पार पडत आहे. आम्ही आतापर्यंत अनेक कार्यक्रम केले, परंतु किर्तना एवढे समाधान कधी मिळाले नाही, असे सांगत कीर्तनकार सह उपस्थित सर्वांचे मी ऋण व्यक्त करीत दरवर्षी किर्तन अमृत साजरा होणार असल्याचे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले

रोहा तालुका वारकरी संप्रदाय यांच्या संयोजनातुन व ना.आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या नियोजनातुन सौ.वरदा सुनील तटकरे यांच्या ६१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून वरदायी कीर्तन अमृत हा किर्तनरुपी गजर च्या समारोप प्रसंगी कुंडलिका नदी संवर्धन येथे पार्किंग मैदानात नामदार आदिती तटकरे बोलत होत्या

या वेळी गीताताई तटकरे, वरदाताई तटकरे, माजी आ.अनिकेत तटकरे, वेदांती तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, शिवराम शिंदे, प्रितम पाटील, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, अनिल भगत, माजी नगराध्यक्ष रत्नप्रभा काफरे, समिर शेडगे, महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, पुजा पोटफोडे, निता हजारे, समिक्षा बामणे, श्रध्दा पाटणकर, मानसी दाते, स्वरांजली शिर्के आदि उपस्थित होते.

यावेळी अनिकेत तटकरे यांनी तीन दिवस किर्तन अमृत मध्ये ४ ओळींचे दोन तास किर्तन करुन आपले जीवनपट, राहाणीमान कीर्तनकाराने आपल्यासमोर मांडले आहे. हे ऐकताना एक कीर्तन संपू नये असे वाटत होते. पुढच्या वर्षी आपल्या सर्वांच्या साथीने व सर्वांच्या संगतीने कीर्तन अमृत करूया, असे सांगितले.

या वेळी कुंडलिका नदी संवर्धन येथे शेवटच्या दिवशी वैष्णवांचा मेळा जमला होता. रोहा तालुक्यातील हरिभक्त, वारकरी कीर्तन ऐकण्यास जमा झाले होते.हा संपूर्ण किर्तन अमृत ना. आदिती तटकरे व माजी आ. अनिकेत तटकरे उपस्थितां मध्ये बसुन ऐकत होते. महाप्रसाद च्या वेळी स्वतः नामदार अदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे उपस्थित सर्व हरिभक्त, वारकरी यांना महाप्रसाद वाढत होते. सर्वांचे विचारपूस करत होते.वरदायी कीर्तन अमृत याची सांगता प्रसिद्ध कीर्तनकारह.भ.प. कांचन माऊली जगताप (नाशिक) यांच्या कीर्तनाने झाली.

# भाजप नेरळ शहर मंडळ अध्यक्षपदी नरेश मसणे; शहरात मिरवणूक

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**



भाजप नेरळ शहर मंडळ अध्यक्षपदी नरेश उर्फ पप्पू मसणे यांची निवड करण्यात आली आहे. नुकताच त्यांना पक्षाचे नेते तथा पनवेलचे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या हस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले आहे. नरेश मसणे यांच्या नावाची घोषणा होताच भाजप पक्षाच्या वतीने नेरळ शहरात ढोल बाज्या वाजवत भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती.

यावेळी तालुक्यातील भाजप वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित झाले होते.भाजप जिल्हा सचिव मंगेश म्हसकर यांचे निकट वर्तीय असलेले नरेश मसणे हे राजकीय क्षेत्रातील नावाजलेले नाव आहे. पंचायत समितीचे सदस्यपद भुषवलेले मसणे यांना शासकीय कामांचा दांडगा अनुभव असल्याने याचा फायदा देखील भाजपला आता होणार आहे.

राज्यातील २०२९ लोकसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेवून भाजप पक्ष कामाला लागला आहे.त्यामुळे बूथ स्थरावर पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी भाजप वरिष्ठ नेत्यांनी काही पक्षात धोरणात्मक बदल घडवून आणले आहेत.१०० बूथ मागे एक मंडळ अध्यक्ष नेमणूक करीत भाजप पक्ष संघटना मजबूत करीत आहेत. कर्जत शहर मंडळ अध्यक्षपदी राजेश लाड यांची निवड केली आहे तर कशेळे ग्रामीण मंडळाध्यक्षपदी दिनेश रसाळ यांची नेमणूक केली आहे.सर्वात महत्वाचा असलेला नेरळ शहर मंडळ अध्यक्षपदी नरेश मसणे यांची निवड करून भाजप पक्षाने आपली ताकद ग्रामीण भागासह शहरात ही वाढवली आहे.येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षाची केलेली मोर्चे बांधणी यामुळे भाजप तालुक्यात कमळ फुलवेल असेच चित्र सध्या तरी दिसून येत आहे.

या आधी राष्ट्रवादीतून भाजप मध्ये आलेले मंगेश म्हसकर यांनी नेरळ शहरात भाजपला खऱ्या अर्थाने सुगीचे दिवस आणले होते.तालुका मंडळ अध्यक्षपदी म्हसकर यांनी धुरा हाती घेतल्यानंतर भाजपला अधिकच बळ मिळाले आहे. त्यातच नरेश मसणे यांनी मंगेश म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली भाजप पक्षात प्रवेश केल्यानंतर शेलु पंचायत समिती गणात भाजपने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखवले,भाजपचे रायगड जिल्हा सचिव असलेले मंगेश म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली आता नरेश मसणे यांनी मंडळ अध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी हाती घेतली आहे त्यामुळे येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती त्याच बरोबर ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप आपले स्वतंत्र उमेदवार निवडून आणेल, अशी आशा आहे.

नरेश मसणे यांनी भाजप नेरळ शहर मंडळ अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेताच नेरळ शहरातून गणेश मंदिर ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौका पर्यंत काढलेली मिरवणूक हे मोठे शक्ती प्रदर्शन होते. त्यामुळे म्हसकर यांनी मसणे यांच्या पाठीमागे राहून खेळलेली राजकीय खेळी किती यशस्वी ठरते हे देखील पाहणे महत्त्वाचा ठरणार आहे.

## ‘कर्जतच्या विकासाला चालना देणारी सकारात्मक चर्चा’



**कर्जत : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे किसान सेलचे उपध्यक्ष सुनील गोगटे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन राजगुरुनगर–भीमाशंकर–कर्जत–पनवेल रस्ता या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ अंतर्गत येणाऱ्या कर्जत बायपास प्रकल्पाचा डीपीआर पूर्ण झाला असून तो लवकरात लवकर मार्गी लागावा यासाठीही विनंती करण्यात आली.

या भेटीत कर्जत तालुक्यातील विविध महामार्ग प्रकल्प व इन्फ्रास्ट्रक्चर योजनांवर देखील सखोल चर्चा झाली. विशेष म्हणजे गडकरी यांनी स्वतःहून माथेरानमधील ई–रिक्षासंदर्भात चौकशी केली. त्यांच्या पुढाकारातूनच माथेरानमध्ये ई–रिक्षा सुरू झाल्या होत्या, याची आठवण त्यांनी प्रेमपूर्वक करून दिली. यासोबतच माथेरानच्या मिनी ट्रेनबाबतही त्यांनी विशेष विचारणा केली. यावरून कर्जतच्या विकासाबाबत ते किती जागरूक आणि बांधील आहेत याचा प्रत्यय आला.

त्याप्रमाणेच भीमाशंकर रोपवे आणि माथेरान चा रोपवेला सुद्धा प्रकल्प मंजुरी दिली त्यासाठी त्यांनी सुद्धा खूप मदत केली होती याची आठवण तेथे निघाली. ’गडकरींनी लवकरच कर्जतला प्रत्यक्ष भेट देऊन विविध प्रकल्पांचे उद्घाटन करण्याची इच्छा व्यक्त केली. ही संपूर्ण कर्जतवासीयांसाठी आनंदाची आणि प्रेरणादायक बाब आहे.

या भेटीद्वारे कर्जतच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला सकारात्मक दिशा मिळाली असून, लवकरच कर्जतचा काया पालट होईल. माझ्या पाठीमागे अनेक सहकार्यांनी कर्जतच्या विकासासाठी लावलेला रेटा त्यामुळे मी केलेला पाठपुरावा याला लवकरच चांगले स्वरूप येईल.’ असे सुनील गोगटे यांनी सांगितले. या वेळी स्नेहा गोगटे उपस्थित होत्या.

## संविधान गुण गौरव परीक्षेत हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग

**माणगाव : बातमीदार**




संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घरोघरी संविधानिक मूल्ये पोहोचावीत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या ’घर घर संविधान’ या निर्णयाची अंमलबजावणी माणगांव गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात नाविन्यपूर्ण पद्धतीने विविध उपक्रम राबवून करण्यात येत आहे.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील इयत्ता तिसरी ते अकरावी पर्यंतच्या सर्व इच्छुक विद्यार्थ्यांची बहुपर्यायी स्वरूपाची एक संविधान गुण गौरव परीक्षा आयोजित करण्यात आली होती. सदर उपक्रमात हजारो विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने सहभाग नोंदवला.

गेल्या चार महिन्यांपासून माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांच्या परिपाठादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना संविधानाच्या प्रत्येक अनुच्छेदाविषयी साध्या सोप्या भाषेत विश्लेषण करणाऱ्या आपले संविधान या संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण सर लिखित लेखमालेच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येत होते. याच लेखमालेवर आधारित अभ्यासक्रम सदर परीक्षेसाठी निश्चित करण्यात आला होता.

अशाप्रकारे नावीन्यपूर्ण पद्धतीने घर घर संविधान या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणारा रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका हा महाराष्ट्र राज्यातील कदाचित एकमेव तालुका असावा. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, विस्तार अधिकारी कुमार खामकर, धुळदेव कोळेकर, शंकर शिंदे, सर्व केंद्रप्रमुख, संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण, सर्व साधन व्यक्ती, सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक बंधू भगिनींनी यशस्वी प्रयत्न केले.

पान १ वरुन

## पनवेलमधील दिलीप देसले यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

पोदी येथील स्मशानभूमीत दिलीप देसले यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी शिक्षणमंत्री दादा भुसे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार रामकृष्ण पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, धनराज विसपुते, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, रामदास शेवाळे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जिल्हा चटणीस अमरीश मोकल, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोज भुजबळ, संदीप पाटील, तेजस कांडपिळे, सरपंच प्रमोद भिंगारकर, जगदीश घरत, सुनील घरत, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल शहर अध्यक्ष दशरथ म्हात्रे, जितेंद्र वाघमारे, भीमराव पोवार, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर,दीपक पवार, आर.डी. निकम, किशोर चौतमोल, अभिषेक भोपी, पनवेल शहर मंडळ उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, रूपेश नागवेकर, गौरव कांडपिळे यांच्यासह अनेक सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी आणि नागरिकांनीही दिलीप देसले यांच्या अंत्यसंस्कारात सहभागी होऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. या घटनेमुळे पनवेल शहरावर शोककळा पसरली आहे.

# मुस्लिमांकडून आतंकवाद्यांचा निषेध



**पनवेल : वार्ताहर**

काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात अनेक निष्पाप जीवांना आपले प्राण गमवावे लागले. नाव आणि धर्म विचारून दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना लक्ष केले. या हल्ल्याचा आम्ही निषेध करत आहोत. देशातील शांतता अबाधित ठेवण्यासाठी आणि शांतता कायम राखण्यासाठी सकल मुस्लिम समाज पनवेलतर्फे शहरातून निषेध मोर्चा काढण्यात आला. या वेळी पाकिस्तान मुर्दाबाद आतंकवाद मुर्दाबाद अशी निषेधात्मक घोषणा देऊन निषेध व्यक्त केला.

पनवेल शहरातील मुस्लिम नाका येथील सुविधा मेडिकल जवळ सायंकाळी पाच वाजता मोर्चाला सुरुवात झाली. काळे झेंडे दाखवत, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत मुस्लिम बांधव या मोर्चात सहभागी झाले होते. दहशतवाद्यांनी मुसलमानांचे नाव घेऊन जो हल्ला केला त्यामुळे भारतात मुस्लिम समाज बदनाम झाला आहे. मुसलमानांच्या नावाने उद्या कोणीही काहीही करू शकतो, परंतु भारतीय मुस्लिम नेहमीच देश हितासाठीच जगणार आहे अशी प्रतिक्रिया मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ मोर्चाचा समारोप करण्यात आला.

मोर्चादरम्यान काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बजरंग राजपूत परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. पूर्ण पोलीस बंदोबस्तात हा मोर्चा काढण्यात आला. विशेष म्हणजे या मोर्चात मुस्लिम महिला देखील सहभागी होऊन निषेध नोंदवत होत्या. यामध्ये प्रामुख्याने इकबाल काझी, मा.नगरसेवक मुकीत काझी, जैनाब शेख, संतोष पवार, सोफिया मुकादम, सलमान मुकादम, पंचशील शिरसाट, जमीर पठाण, सुश्मिता मोहिते, रेहाना हुसेन, नावेद पटेल, नवाद पटेल, अदनान अन्सारी, बिस्मिल्ला करंबेळकर, सना शेख, सलमा कच्ची रजिया कच्ची, कैकशा शेख, मॅरियम करंबेलकर यांच्यासह मुस्लिम समाजाला या मोर्च्यात पाठिंबा देण्यसाठी विविध समाज बांधव सहभागी झाले होते.

## होर्डिंग उभारणी, जाहिरातीबाबत धोरण तयार करावे –मंत्री राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

सागरी महामंडळाने त्यांच्या जागेच्या वापराबाबत सजग आणि कडक भूमिका घ्यावी. तसेच सागरी महामंडळाच्या जागांवर होर्डिंगची उभारणी, त्यावरील जाहिरातबाबत आणि जागांच्या व्यावसायिक वापराबाबत सर्वसमावेशक धोरण तयार करावे अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.


मंत्रालयात सागरी महामंडळाच्या जागांच्या व्यावसायिक वापराविषयी धोरण ठरवण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. यावेळी सागरी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढीये यांच्यासह महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

सागरी महामंडळांच्या मुंबई महानगर क्षेत्रातील जागांवर होर्डिंग उभारण्यासाठी धोरण राबवताना त्यातून जास्तीत जास्त महसूल निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत असे सांगून मंत्री राणे म्हणाले की, होर्डिंगच्या माध्यमातून किमान १०० कोटी महसूल निर्मितीचे उद्दीष्ट ठेवावे. तसेच यासाठी स्पर्धात्मकता निर्माण करावी. खुल्या निविदा मागवाव्यात. महामंडळाने स्वतः होर्डिंग उभारावीत व त्यावरील जाहिरातीचे हक्क विक्री करावे. महसूल वाढीसाठी मदत होईल. याशिवाय महामंडळाच्या जागांचा व्यावसायिक वापर होतो त्याचेही नियमन करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व जागा भाडेपट्ट्याने देताना स्पर्धात्मकता आणण्याच्या दृष्टीने निविदा मागवण्याची कार्यवाही करावी, अशा सूचनाही मंत्री राणे यांनी बैठकीत दिल्या.

**दुखवटा**

## राधिका रिकामे

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुका विभागीय यादव गवळी समाजाचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध समाजसेवक लीलाधर रिकामे यांच्या मातोश्री राधिका गोविंद रिकामे (वय ९५) यांचे ७ एप्रिल रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. राधिकाताई समाजात ‘आपली आई’ म्हणून ओळखल्या जात त्यांच्या पश्चात दोन मुलगे, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे आहेत.



राधिकाताईंच्या निधनाचे वृत्त कळताच विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत श्रद्धांजली अर्पण केली. राधिकाताईंनी अत्यंत कष्टाने आपल्या मुला–बाळांना उच्चशिक्षित व सुसंस्कारित घडवले.

## निवडक

### मुलीच्या नातेवाईकांचा शोध सुरू



**पनवेल :** रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक सहा वर्षीय अल्पवयीन मुलगी सापडली असून तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. ही मुलगी आपले नाव पिंचुक पोपट (पिंकी) एवढेच सांगते. वय ६ वर्षे, ती कुठे राहते तिला माहित नाही. या मुली संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पीएसआय यादव, म.पो.हवा.बोराटे (९८२१४२५४०४) व पो.शि.आर.एस.मुंडे (९०७५३११३९०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खारघर वसाहतीत घरफोड्या

**पनवेल :** खारघर वसाहतीमधील दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या घरफोडीत हजारो रुपये किंमतीचा ऐवज लंपास झाल्याची घटना घडली आहे. खारघर सेक्टर ३ बेलपाडा येथे आनंद पाटकर हे राहतात. त्यांच्या राहत्या घरातून चोरट्याने चोरी केली तसेच खारघर सेक्टर १० येथे राहणारे तेजस भोंग यांच्याही घरात चोरी झाली आहे. दोघांच्या घरात मिळून ६६ हजार रुपयांचे सहा मोबाइल आणि एक लॅपटॉप चोरी झाला आहे. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बांगलादेशी तरुणाला अटक

**पनवेल :** मागील सहा महिन्यापासून मोठा खांदा गावात अवैध वास्तव्य करुन राहणार्या एका ३० वर्षीय बांगलादेशी तरुणाला कामोठे पोलिसांनी अटक केली आहे. मोहम्मद इफ्तिकार मोल्ला असे या तरुणाचे नाव आहे. मोठा खांदा गावातील एका खोलीत मोहम्मद मोल्ला हा राहत होता. बांधकाम मजुरीचे काम करणारा मोहम्मद हा बांगलादेशी असल्याची माहिती कामोठे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक राकेश पगारे यांना मिळाल्यानंतर त्यांनी पोलीस शिपाई राजेंद्र इलग यांच्यासोबत जाऊन मोहम्मदला ताब्यात घेतले. त्याच्याजवळील कागदपत्रांची पडताळणी केल्यावर मोहम्मद हा बांगलादेशातील खुल्ना जिल्ह्यातील लष्करपूर गावचा असल्याचे समोर आले. कामोठे पोलीस ठाण्यात मोहम्मद याच्याविरोधात पारपत्र अधिनियम अंतर्गत पोलिसांनी मोहम्मद याला अटक केली.

# दुचाकींच्या वाढत्या चोर्‍यांमुळे वाहनमालक त्रस्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर उपनगरातून दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले आहे. एका दिवसात दुचाकी चोरीचे तीन गुन्हे खारघर पोलीस ठाण्यात नोंदवले गेले आहेत. पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे.

सिडको मंडळाने खारघर उपनगरासह सर्वच उपनगरांमध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी आणि इतर चोर्‍या रोखण्यासाठी मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केले आहेत, मात्र तरीही चोरटे सक्रिय झाले आहेत. त्यामुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. खारघर येथील सेक्टर १५ मधील कुंजविहार सोसायटीमध्ये राहणार्या महिलेने त्यांची दुचाकी चार दिवसांपूर्वी रात्री साडेनऊ वाजता दीपशाईन सराफ दुकानासमोरील रस्त्याच्या समोर उभी केली होती. १० मिनिटांत संबंधित महिला दुचाकी घेण्यासाठी आल्यावर त्यांना ती सापडली नाही. तसेच दुसर्‍या घटनेत सेक्टर ३४ येथील लक्ष्मी पॅराडाईज या सोसायटीत राहणाऱ्या २९ वर्षीय तरुणाने त्याची दुचाकी सकाळी साडेदहा वाजता खारघर रेल्वे स्थानकालगतच्या खववशेजारील मोकळ्या जागेत उभी केली होती. रात्री साडेअकरा वाजता केली होती आल्यावर त्याला दुचाकी सापडली नाही.

तिसर्‍या घटनेत सेक्टर ११ येथील केंद्रीयविहार सोसायटीत राहणार्या २७ वर्षीय तरुणाने सकाळी अकरा वाजता खारघर रेल्वे स्थानकाजवळील अंबिका हाइट्स या इमारतीसमोरील पदपथावर दुचाकी उभी केली होती. रात्री साडेनऊ वाजता ती दुचाकी तेथे नव्हती. खारघर आणि खांदेश्वर आणि मानसरोवर रेल्वे स्थानके वाहन चोरट्यांची लक्ष्य ठरत आहेत. वाहनमालकांनी बेभरवशावर वाहने उभी केल्याने चोरट्यांचे फावत आहे.

याचा लाभ चोरट्यांना होत असून शेकडो वाहने या परिसरातून चोरी झाली आहेत. वाढत्या वाहनचार्या रोखण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी स्वतंत्र उपाययोजना करावी, अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

## जागृत महिलांमुळे हरविलेली दागिन्यांची पिशवी मिळाली परत

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथे राहणाऱ्या तीन जागृत महिलांमुळे पनवेल शहरातील जोशी आळी येथे एका कुटुंबियांची सोन्याच्या दागिन्यांची पिशवी हरविली होती ती त्यांना परत मिळाल्याने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रु उभे राहिले होते.

नवीन पनवेल येथे राहणाऱ्या आदिती खानविलकर, वर्षा ढाके, अनुराधा बाहेकर या तिघी खरेदीसाठी पनवेल शहरातील जोशी आळी येथे आल्या असताना त्यांना पिशवी आढळून आल्याने सदर पिशवी त्यांनी तपासली असता त्यामध्ये काही दागिने आढळले व त्या पिशवीवर असलेल्या ज्वेलर्सच्या नावामुळे सदर दुकानात या तिघी गेल्या व त्यांनी मिळालेल्या पिशवी संदर्भात माहिती दिली. सदर दुकान मालकाने सुद्धा काही वेळापूर्वीच एक महिला व एक पुरुष त्यांचे दागिने पॉलिश करण्यासाठी येथे आले असल्याचे त्यांनी सांगितले, परंतु त्यांच्याकडे त्यांचा मोबाईल नंबर व इतर माहिती नव्हती. दरम्यान, त्यांनी सीसीटीव्ही फुटेजद्वारे त्यांना शोधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यातही त्यांना अपयश आले. त्याचवेळेत दोघेजण त्या दुकानात पुन्हा आले असता त्यांनी आपली सोन्याच्या दागिन्यांची पिशवी हरविल्याचे सांगितले.

या महिलांनीसुद्धा पूर्ण त्यांची सहानिशा व या पिशवीत कुठले दागिने होते याची माहिती घेतली व त्यावेळी त्यांची पूर्ण खात्री पटली की या दागिन्यांचे मालक हे दोघे आहेत. त्यानुसार इतर नागरिकांच्या उपस्थितीत सदर सोन्याच्या दागिन्यांची पिशवी त्यांना परत केली. या वेळी सदर महिलेच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले होते व या तिघींच्या प्रामाणिक पणाबद्दल मनापासून आभार मानले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाहिली अंबालाल पटेल यांना श्रद्धांजली

**खारघर : रामप्रहर वृत्त**





भाजप उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांचे वडिल व भारतीय किसान संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष स्वर्गस्थ अंबालाल पटेल यांच्या निधनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी ब्रिजेश पटेल यांच्या निवासस्थानी उपस्थित राहून स्वर्गीय अंबालाल पटेल यांना श्रद्धांजली वाहिली.

या वेळी त्यांच्यासमवेत भाजपचे उत्तर जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, सरचिटणीस दीपक बेहेरे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, पनवेल शहर मंडळाचे अध्यक्ष सुमित जुंजाराव, नवीन पनवेल मंडळाचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कर्जत मंडळाचे माजी अध्यक्ष राजेश भगत, कामोठे महामंडळाचे माजी अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर मंडलाचे सरचिटणीस दीपक शिंदे, दिलीप जाधव, अजय माळी, अशोक जांगीड, शैलेश पटेल आदींनी उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली.

## लिमये वाचनालयात 'वसंत व्याख्यानमाला'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षी शुक्रवार दि.२५ एप्रिल २०२५ ते रविवार दि. २७ एप्रिल २०२५या कालावधीत संस्थेच्या ज्ञानेश्वर सभागृहात सायंकाळी ६ वाजता 'वसंत व्याख्यानमाला' आयोजित केली आहे.

शुक्रवारी २५ एप्रिल रोजी रामजी कदम (माणगाव) हे शिवचरित्रावर भाष्य करणार आहेत. शनिवार २६ एप्रिल या दिवशी प्रा.अमेय महाजन (मुंबई) हे 'स्पर्धा परीक्षा, आजची तरुणाई आणि पालकांची भूमिका' याविषयी बोलणारआहेत.

तर रविवारी २७ एप्रिलला ॲड.विलास नाईक(अलिबाग)हे 'लेखक तुमच्या भेटीला' याबाबत संवाद साधणार आहेत. वरील कार्यक्रमास सर्वांनी बहुसंख्येने आवर्जून उपस्थित रहावे,असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी केले आहे.

## पनवेल परिसरात चार ठिकाणी सिग्नल यंत्रणा

**पनवेल : वार्ताहर**

वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने पालिकेच्या माध्यमातून चार ठिकाणी सिग्नल यंत्रणा उभारण्याचे काम सुरू आहे. याकरिता जिल्हा नियोजन समितीकडून आलेल्या १ कोटी ८७ लाखांच्या निधीचा वापर करण्यात आला आहे. या खर्चातून यंत्रणेची दोन वर्षे देखभाल दुरुस्ती करण्यात येणार आहे.

पनवेल शहरातील पंचरत्न सर्कल, छत्रपती शिवाजी महाराज चौक नवीन पनवेलमधील शिवा कॉम्प्लेक्स परिसरातील चौक आणि मुंब्रा-पनवेल मार्गावरून फूडलैंड कंपनीमार्गे तळोजा औद्योगिक वसाहतीत प्रवेश करण्यासाठी वापरात असलेल्या मार्गावर वाहतूककोंडी होत असते.

वाहतूक कोंडीवर उतारा म्हणून या ठिकाणी सिग्नल यंत्रणा उभारण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत होती. वाहतूक विभागाकडून देखील अशा प्रकारची मागणी करण्यात आल्याने पालिका प्रशासनाने पुढाकार घेऊन सिग्नल यंत्रणा उभारण्याचे काम सुरु करण्यात आले असून पुढील दोन वर्षांसाठी देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च पालिकेच्या वतीने केला जाणार असल्याची माहिती पालिका अधिकार्यानी दिली आहे. पालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामामुळे वाहनचालकांची कोंडीतून सुटका होणार असल्याने वाहनचालकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

## महात्मा फुले महाविद्यालयात पदवीदान समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये ३० एप्रिल रोजी पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. जे. जी जाधव ही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत राहणार असून समारंभाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे आहेत.

या पदवीदान समारंभांमध्ये सन २०२३-२४ मध्ये झालेल्या पदवी व पदव्युत्तर परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना सन्माननित करण्यात येणार आहेत. पदवी स्वीकारण्याचा क्षण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अनुभवता यावा यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश ठाकूर, उपप्राचार्य, पदवीदान समारंभाचे चेअरमन उपप्राचार्य डॉ आर.ए.पाटील, डॉ.एन.बी.पवार यांनी गतवर्षीच्या सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना आमंत्रित केले आहे.



**पनवेल : भाजपचे माजी शहराध्यक्ष अनिल भगत यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी जिल्हा चिटणीस अमरिश मोकल, भाजप पनवेल व्यापार व उद्योग आघाडी संयोजक विनोद बाफना, जैन प्रकोष्ठ कोकण विभाग सहप्रमुख शिव देवडा, संजय बाफना, जैन ललित इन्टोदिया, विनय जैन, जितेंद्र संचेती यांच्यास जैन समाज व व्यापारी समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी अनिल भगत यांचे अभिष्टचिंतन केले.**



**उलवे नोड : जम्मु काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा शहरातील नागरिकांनी रस्त्यावर उतरुन निषेध केला.**



**पनवेल : भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्षपदी दशरथ म्हात्रे व नेरे मंडळ अध्यक्षपदी भूपेंद्र पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल दोघांचे भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य भूपेंद्र पाटील, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, सुकापूर ग्रामपंचायत सदस्यो प्राची जाधव यांनी अभिनंदन केले.**

## रवी गिते यांची कोकण विभागीय माहिती उपसंचालकपदी पदोन्नती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरिष्ठ अधिकारी रवी गिते यांनी कोकण विभागीय माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला. नवी मुंबईतील कोकण भवन येथे आयोजित छोटेखानी कार्यक्रमात प्रभारी उपसंचालक अर्चना शंभरकर यांच्याकडून त्यांनी पदाचा कार्यभार स्वीकारला.

या वेळी ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, कोंकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, सहायक संचालक संजिविनी जाधव-पाटील, उपसंपादक प्रवीण डोंगरदिवे, पत्रकार मच्छिंद्र पाटील, कोंकण विभागीय कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाच्या २२ एप्रिल रोजी काढलेल्या आदेशानुसार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सात वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपसंचालक (माहिती) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. या यादीत जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत असलेले रवी गीते यांचाही समावेश आहे.

गिते यांचे पत्रकारितेपासून शासकीय सेवेपर्यंतचे प्रवास अत्यंत उल्लेखनीय ठरले आहेत. शासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी लोकपत्र, नवराष्ट्र आणि सामना या प्रमुख दैनिकांत पत्रकार म्हणून कार्य केले. त्यांच्या पत्रकारितेतील अनुभवाचा त्यांनी माहिती विभागातील सेवेमध्ये प्रभावीपणे उपयोग केला आहे.

शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात सहायक संचालक म्हणून सुरुवात केली. त्यानंतर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी म्हणून यशस्वीपणे कार्य केले. सध्या ते वर्धा जिल्ह्यात जिल्हा माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते.

त्यांच्या पदोन्नतीनंतर आता त्यांनी कोकण विभागीय माहिती उपसंचालक या नव्या आणि जबाबदारीच्या पदावर रुजू होत कोकण विभागातील शासकीय माहिती व्यवस्थापनाला अधिक सक्षम दिशा देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यांच्या कार्यकुशलतेचा आणि अनुभवाचा फायदा कोकण विभागाला निश्चितच होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## वन्यजीवांच्या रक्षणासाठी झटणाऱ्या तरुणांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**



खारघर डोंगरावर लागलेला वणवा विझवून वन्यजीवांची सुरक्षा तसेच डोंगरावर अडकलेल्या तरुणाची सुटका करणाऱ्या तरुणांचे 'सिडको'चे मुख्य अग्निशमन अधिकारी विजय राणे यांनी सत्कार केल्यामुळे पर्यावरण प्रेमी समाधान व्यक्त करीत आहेत.

पनवेल महापालिका अग्निशमन दल आणि सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात आला. नवीन पनवेल येथून खारघर दरम्यान काढण्यात आलेल्या अग्निशमन रॅलीचा समारोप खारघर येथील अग्निशमन केंद्रात पार पडला. दरम्यान, खारघर डोंगरावर दिवाळी नंतर अज्ञात व्यक्ती कडून वणवा लावला जातो. अनेक वेळा खारघरचे अग्निशमन जवान शर्तीचे प्रयत्न करुन वणवा आटोक्यात आटोक्यात आणतात, मात्र डोंगर माथ्यावर तसेच डोंगरावर वणव्याची माहिती मिळताच डोंगरावर लावण्यात येणार्या वणव्यामुळे वन्यजीवांची होणारी हानी रोखण्यासाठी नेहमी अग्रेसर असणारे तसेच काही दिवसापूर्वी डोंगरावर अडकलेल्या पर्यटकांची पोलिसांच्या मदतीने सुटका करणारे कातकरी पाड्यातील प्रकाश कातकरी, सुनील कातकरी, ओवे कॅम्प मधील नितीन तिवारी, नितीन आडे, खारघर डोंगरावर वणवा विझवणारे नितीन अड्डु यांचा सत्कार 'सिडको'चे मुख्य अग्निशमन अधिकारी विजय राणे यांनी केला.

या वेळी अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके, सौरभ पाटील, पर्यावरण प्रेमी ज्योती नाडकर्णी उपस्थित होते. यावेळी नाडकर्णी यांनी डोंगरावरील वणवा अथवा अचानक काही प्रसंग ओढविल्यास त्यातून सुटका करण्यासाठी तरुणांना अग्निशमन विभागाकडून योग्य प्रशिक्षण देण्याची विनंती केली. यावेळी राणे यांनी देखील चांगली बाब असून प्रयत्न केला जाईल असे सांगत वणवा विझविण्यासाठी सहकार्य करणार्या तरुणांनी अग्निशमन विभागाला सहकार्य करावे, असे सांगितले.

## शैक्षणिक कार्यशाळा व दिनदर्शिका प्रकाशन सोहळा

### पनवेल महापालिका आणि शिक्षक संघाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य नगरपालिका महानगरपालिका शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने गुरुवारी (दि.२४) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे भव्य शैक्षणिक कार्यशाळा चला शिक्षणावर बोलू काही तसेच विद्यार्थी शैक्षणिक प्रवास दिनदर्शिका सन २०२५-२६ चा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, आणि सहाय्यक आयुक्त रुपाली माने यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शैक्षणिक मेळावा होणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता विकास आणि पुढील वर्षासाठीचे नियोजन यावर तज्ज्ञ मंडळी उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. या वेळी विद्यार्थी शैक्षणिक प्रवास दिनदर्शिका २०२५-२६ चे प्रकाशन सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत होणार आहे.

कार्यशाळेला पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळांतील मुख्याध्यापक, प्राचार्य आणि प्रत्येकी दोन शिक्षक उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेची वेळ सकाळी १० ते दुपारी २.३० अशी असेल.

### विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

***या कार्यशाळेत विविध शैक्षणिक विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यामध्ये मा. बालाजी जाधव, राष्ट्रीय तंत्रस्नेही शिक्षक (जि.प. प्राथमिक शाळा विजयनगर ता. माण, जि. सातारा) हे आधुनिक तंत्रज्ञान व प्रयोगशील शिक्षण यावर मार्गदर्शन करणार आहेत. मा.दत्तात्रेय वारे, मुख्याध्यापक व राष्ट्रीय प्रयोगशील शिक्षक(जि. प. प्राथमिक शाळा जालिंदरनगर ता. खेड, जि. पुणे) हे प्रगत शाळा आणि प्रभावी अध्ययन व अध्यापन यावर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. इरफान इनामदार, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल, जि. रायगड हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अर्जुन कोळी, राष्ट्रीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार विजेते हे शाळा सुधार व विद्यार्थी गुणवत्ता यावर मार्गदर्शन करणार आहेत.***

## संपादकीय

# सडेतोड उत्तर हवे

पहलगाम येथील हल्ल्यात काही स्थानिकांसह पाकिस्तानी दहशतवाद्यांचा सहभाग होता असे सांगितले जाते आहे. या मागील कटाचा छडा लावला जाईलच. भारत दहशतवादापुढे मुळीच झुकणार नसून हल्लेखोरांपैकी एकालाही सोडणार नाही असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे. शहा यांनी तातडीने पहलगाम येथे जाऊन हल्ल्यातील बळींच्या नातेवाईकांची भेट घेतली. हल्ल्याशी पाकिस्तानचा संबंध नसल्याचा दावा पाकिस्तानने केला असला तरी पाकपुरस्कृत दहशतवादाला सडेतोड उत्तर दिले गेलेच पाहिजे.

**जम्मू-काश्मीरमधील पर्यटन हंगामाला सुरूवात होऊन तो ऐन भरात असतानाच पर्यटकांच्या पसंतीच्या पहलगाम येथे मंगळवारी भीषण दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात देशाच्या निरनिराळ्या राज्यांतील २६ भारतीय पर्यटक आणि दोन स्थानिक नागरिक अशा किमान २८ निष्पापांचा बळी गेला असून किमान वीस जण जखमी झाले आहेत. हल्ल्याच्या भीषणतेमुळे अवघा देश सुन्न झाला असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. अलीकडच्या काळात काश्मीर खोर्‍यात काही प्रमाणात शांतता प्रस्थापित झाल्याने गेली काही वर्षे पुन्हा एकदा देशातील पर्यटकांना काश्मीर खुणावू लागले होते. गेली दोन वर्षे येथील पर्यटकांची संख्या दोन-सव्वा दोन कोटींवर जात होती. येथील पर्यटन तुलनेने स्वस्त असल्याने मध्यमवर्गीय पर्यटक मोठ्या संख्येने काश्मीरला पसंती देऊ लागले होते. परंतु बहुदा काश्मीरमधील जनजीवन व पर्यटन सुरळीत होणे दहशतवाद्यांच्या कुटील कारस्थानांच्या सोयीचे नसावे. म्हणूनच की काय त्यांनी पर्यटकांच्या आवडीचे ठिकाण असलेल्या पहलगामलाच लक्ष्य केले. या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या तपशीलांनी देशभरातील सर्वसामान्य अस्वस्थ झाले आहेत. महाराष्ट्रातील तर सहा निष्पाप पर्यटकांचा या हल्ल्यात बळी गेला असून यात एकमेकांचे मावसभाऊ असलेले डोंबिवलीचे तीन जण, पुण्याचे दोन मित्र व नविन पनवेल येथील रहिवासी दिलीप देसले यांचा समावेश आहे. मित्र, नातेवाईक आणि कुटुंबियांसमवेत विरंगुळ्याचे क्षण व्यतीत करण्यासाठी काश्मीरला गेलेल्या या सर्वसामान्य नागरिकांची त्यांच्या कुटुंबियांसमोर क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे. पहलगामच्या बैसारण परिसरात सशस्त्र दहशतवाद्यांनी पर्यटकांना नावे विचारून त्यांच्यावर गोळीबार केला. या हल्ल्यानंतर स्वाभाविकच पहलगाम आणि अवघ्या काश्मीरमधून पर्यटक परतू लागले असून कालपर्यंत पर्यटकांनी फुलून गेलेले काश्मीर एका दिवसात ओस पडले आहे. खोर्‍यातील स्थानिकांनाही हा दहशतवादी हल्ला मोठा धक्का देऊन गेला आहे. हा आमच्याही कुटुंबावरील, रोजीरोटीवरील हल्ला आहे असे म्हणत तेथील पर्यटन व्यवसायाशी संबंधित स्थानिकांनी मंगळवारीच हल्ल्याच्या निषेधार्थ मार्चचे आयोजन केले. देशाच्या निरनिराळ्या भागांतही हल्ल्याच्या विरोधात संतापाची व निषेधाची प्रतिक्रिया उमटू लागली असून भारत सरकार हल्ला करणार्‍या दहशतवाद्यांच्या व कट रचणार्‍या पाकिस्तानातील त्यांच्या पोशिंद्यांच्या विरोधात काय निर्णय घेते याकडेच आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे. हल्ल्यात पती गमावलेली नवविवाहिता हिमांशी हिचे अश्रू सगळ्यांनाच हेलावून गेले आहेत. या अश्रूंचा हिशेब हवा अशी मागणी लोकांकडून होते आहे. अशा प्रकारचे हल्ले एका रात्रीत होत नाहीत. त्यामागे निश्चितच मोठे कटकारस्थान असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरबस्तानात असताना व अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स भारत दौर्‍यावर असताना हा हल्ला झाला असून ही वेळ अतिरेक्यांनी साधली का, असा प्रश्नही विचारला जातो आहे. हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदी लगेचच भारतात परतले असून सरकारकडून दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर दिले जाईल याची खात्री आहे.**

# एल्डर लाईन - १४५६७ ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्पलाईन



गेल्या काही दशकांमध्ये वृद्धांच्या संख्येमध्ये वेगाने वाढ नोंदवली गेली आहे. सध्या, देशामध्ये सुमारे १५ कोटी लोकसंख्या ६० वर्षांपेक्षा जास्त वयाची आहे, ही देशातील एकूण लोकसंख्ये पैकी ९ % पेक्षा जास्त आहे. विविध संशोधन, कागदपत्रांनुसार, ही संख्या २०५० पर्यंत साधारण ३५ कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. भारतातील ज्येष्ठ नागरिकांची सहानुभूतीपूर्वक सेवा करून सुखी आणि निरोगी जीवन वृद्धींगत करण्यासाठी, विविध सरकारी विभाग, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, अशा अनेक वचनबद्ध भागीदारांच्या सहभागातून आवश्यक ती माहिती आणि सहकार्य करून, भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार मार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी राष्ट्रीय टोल फ्री हेल्पलाइन; एल्डरलाईन- १४५६७, सर्व राज्यांत व केंद्र शासित प्रदेशात सुरु करण्यात आली आहे.

सदर हेल्पलाईन राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (छ्खडऊ), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये चालविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात एल्डर लाईन १४५६७ ही सेवा ऑगस्ट २०२१ पासून राबवली जात आहे. या मध्ये कनेक्ट सेंटर व फिल्ड टीम, विविध शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, विविध ज्येष्ठ नागरिक संघटना, विविध स्वयंसेवी संस्था, कायदेविषयक सल्लागार, समुपदेशक, स्वयंसेवक आदींच्या सहभागातून व मदतीने कार्यरत आहे. आज अखेर, राज्यभरातून जेष्ठ नागरिकांसाठी चार लाखाहून अधिक कॉल्स आले आहेत. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रकारे मदत हेल्पलाइन ने केली आहे. तसेच तीस हजार हून अधिक प्रकरणे क्षेत्रीय पातळीवर यशस्वीरित्या हाताळली आहेत .

**हेल्पलाईनशी संबंधित अत्यंत महत्त्वाची माहिती :**

एल्डर लाईन साठी १४५६७ हा क्रमांक टोल-फ्री आहे. एल्डर लाईन चे कार्य आठवड्याचे सर्व दिवस (म्हणजेच रविवार ते शनिवार) सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० चालते. संपूर्ण वर्षातील ३६२ दिवस सुरू असते (फक्त २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर रोजी सुट्टी असते)

**एल्डर लाईन द्वारे दिल्या जाणार्‍या सेवा:**

**माहिती देणे :** आरोग्य विषयक जागरूकता, वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, पोषण, सांस्कृतिक, कला, ज्येष्ठां संबंधी अनुकूल उत्पादने, आणि मनोरंजनाशी संबंधित माहिती.

**मार्गदर्शन :** कायदेविषयक (वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर दोन्ही), विवाद निराकरण (मालमत्ता, शेजारी इ.), आर्थिक, पेन्शन संबंधित सल्ला, आणि सरकारी योजनांची माहिती

**भावनिक समर्थन:** चिंता निराकरण, नातेसंबंध व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित भीती निवारण, जीवन व्यवस्थापन, (वेळ, ताण, राग व्यवस्थापन) मृत्यूपूर्वीचे दस्तऐवजीकरण (मृत्युपत्र बनवण्याचे महत्व इ.)

**क्षेत्रीय पातळीवर मदत:** विविध सरकारी यंत्रणा, भागधारक, स्वयंसेवक, सामाजिक संस्था यांचे मदतीने बेघर वृद्ध, अत्याचारग्रस्त ज्येष्ठ नागरिक, किंवा हरवलेल्या व्यक्तींना मदत करण्याचा प्रयत्न व त्यांना परिवाराशी पुनर्मिलन करणे साठी कार्य करणे.

**एल्डर लाईन टीम विषयी :** एल्डर लाईन १४५६७ ची टीम कनेक्ट सेंटर च्या माध्यमातून व जनसेवा फौन्डेशन च्या माध्यमातून संस्थापक चेअरमन डॉ. विनोद शहा, सौ.मीना शहा , श्री जयदेव नाईक व अन्य विश्वस्त तसेच महाराष्ट्र राज्य एल्डर लाईन १४५६७ चे प्रकल्प व्यवस्थापक: श्री. स्मितेश शहा, टीम लीडर : प्रियांका कांबळे, गजानन इंगळे. स्टेला काकडे, राजेंद्र आहेर यांचे सह सर्व कनेक्ट सेंटर ऑफिसर सातत्याने कार्यरत आहेत.

**अधिक माहिती :** एल्डर लाईन १४५६७ या हेल्पलाईन आणि तिच्या संपूर्ण भारतातील सेवांबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी वेबसाईट www.elderline.dosje.gov.in

**एल्डर लाईन १४५६७ महाराष्ट्र ने प्रत्यक्ष केलेले मदत कार्याची उदाहारणे -**

मुंबई मध्ये सापडलेले एक ज्येष्ठ नागरिक स्मृतीभ्रंश असलेमुळे आपला घरचा पत्ता नीट सांगू शकत नव्हते, दोन महिन्यांचे पाठपुराव्यातून सदर व्यक्तीचे गुजरात मधील घर व नातेवाईक शोधले सदर व्यक्ती ३० वर्षापूर्वी घर सोडून गेल्याचे कळले आशा वृद्धास तीस वर्षानंतर परिवाराशी पुनर्मिलन करून संपूर्ण भारतात एक वेगळा आदर्श निर्माण करण्याचे कार्य एल्डर लाईन महाराष्ट्र ने केले आहे.

हैद्राबाद येथील एका मुलाने ७० वर्षीय मावशीला शिर्डी येथे देवदर्शनाला जायच्या नावाखाली मुंबई येथे सायन भागात सोडून निघून गेला. रात्र झाल्यानंतर सायन पोलिसांनी सदर आजींचा व्हिडीओ सर्वत्र पाठवल्यानंतर महाराष्ट्र टीम, सायन पोलीस, हैद्राबाद टीम ने ३६ तासाचे आत सदर आजींच्या नातेवाइकाना शोध घेतला व त्यांचे समुपदेशन करून वृद्ध महिलेच्या परिवाराशी पुनर्मिलन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

अमरावती जिल्यातील एका ज्येष्ठ नागरिक व्यक्तीला त्याची मुल त्यांना सांभाळत नाही व केस करून सुद्धा काहीच कार्यवाही झाली नाही. त्यानंतर हेल्पलाईन प्रतिनिधी यांनी पाठपुरावा करून जिल्हा प्रसासना मार्फत कार्यवाही केली व केस साठी तारीख दिली व केस सुरू झाली. यामध्ये मुलांना बोलावण्यात आहे व त्यांनी केस सुरु होण्या आधीच मुलाने मान्य केले की ते महिन्याचा आई वडिलांचा खर्च देण्यास तयार आहे. हेल्प लाईन नी त्यांची मदत केल्या मुळे हे सर्व लवकर होऊ शकले असे समस्या ग्रस्त व्यक्तीनी म्हटले व हेल्पलाईनचे आभार मानले

एल्डर लाइन १४५६७ चे कार्य सुरु झाल्यापासून सर्व ज्येष्ठ नागरिकांना याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी एक जागरूक नागरिक या नात्याने समाजाने याचा योग्य फायदा घेणे महत्त्वाचे आहे. देशात ज्येष्ठांची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुले परदेशी वास्तव्यास असल्याने आणि मुलीचे लग्न झाल्याने घरात जेष्ठ व्यक्तींना एकटेच राहण्याची वेळ आली आहे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय हेल्पलाइन सक्रीय आहे व कार्यरत आहे. तरी, ही माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवावी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी जागरूकता निर्माण करावी.

**-स्मितेश शहा, प्रकल्प व्यवस्थापक, एल्डर लाईन**



## बदलते तंत्रज्ञान

# पैशांचे आमिष दाखवणार्‍या टास्कपासून सावधान!

अनेकांना व्हॉट्सअपवर सकाळी, दुपारी किंवा सायंकाळी कधीही हाय, हॅलो असे मेसेज येतात. हे अनोळखी नंबर असतात व त्यावर एखादे मुलीचे गोंडस नाव दिलेले असते. एखादा रिव्ह्यू किंवा लाईक किंवा अन्य काही तरी करा तुम्हाला पहिल्या टास्कचे १५० रुपये मिळतील असे सांगितले जाते. ही टास्क केल्यावर तुम्हाला ते पैसे तुमच्या अकाऊंटमध्ये मिळतात, पण पुढे मोठा घोळ होतो.




तुम्ही कोणत्याही वेबसाईटवर, ॲपवर तुमचा मोबाईल नंबर लॉगईन केलेला असेल आणि जर त्यांचा डेटा हॅक झाला असेल तर तुमचा डेटा डार्क वेबवर असतो. त्यात तुमचा मोबाईल नंबर, नाव, मेल आयडी, जन्म दिनांक, पत्ता आणि पासवर्डही असतो. यामुळे हे लोक तुमच्यापर्यंत पोहचू शकतात. ते तुम्हाला मेसेज करतात आणि प्रलोभन दाखवितात.

सुरुवातीला तुम्हाला १५० रुपये सांगितल्याप्रमाणे देतात आणि मग पुढे तुमच्यासोबत स्कॅम होतो व तुमचे अकाऊंट धुपले जाते. घरात बसून पैसे मिळतात, फक्त काय एक व्हिडीओ तर पहायचा आहे, एखाद्या कंपनीला ती चांगली आहे, असा रिव्ह्यू तर द्यायचा आहे असे म्हणून तुम्ही तुमचे पैसे धोक्यात टाकता. दिवसाला तुम्हाला १०००, २००० रुपये मिळतील अशी आशा दाखविली जाते, त्यात तुम्ही फसता आणि हाती असलेले पैसेही गमावून बसता.

यामुळे या रिव्हू देण्याच्या किंवा व्हिडीओ पाहण्याच्या मेसेजना रिप्लाय देऊ नका. तो नंबर ब्लॉक करून टाका. म्हणजे तुमचे अकाऊंट सेफ राहिल. तसेच त्या नंबरवरून आलेली इमेज किंवा कोणतीही फाईल डाऊनलोड करू नका. असे केल्याने तुमच्या मोबाईलमध्ये ते मालवेअर इन्सटॉल करण्यात यशस्वी ठरतात आणि नंतर तुम्हाला ते फसवू शकतात. सध्या सर्वांचे आयुष्य त्या मोबाईलमध्ये असते. गोपनीय डॉक्युमेंट, अकाऊंट डिटेल्स, खासगी मेसेज, युपीआय ॲप्स आदी गोष्टी त्या मोबाईलमध्ये असतात. यामुळे तुमचा मोबाईल खूप महत्त्वाचा असतो. एखादा अँटीव्हायरस तुम्ही मोबाईलमध्ये टाकू शकता, जो तुम्हाला वर्षाला २०० रुपयांनाही मिळतो.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते राजा परांजपे



## निमित्त

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी चित्रसृष्टीचे शिल्पकार म्हणून विख्यात चित्रकर्ते राजाराम दत्तात्रेय परांजपे यांचा नेहमीच उल्लेख करण्यात आला आहे. जवळपास चाळीस वर्षांची चित्रसंपदा, अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता, लेखक तसेच क्वचित प्रसंगी गायक अशा विविध क्षेत्रात ८० मराठी आणि हिंदी चित्रपटांशी आलेला संबंध अशी त्यामागची परंपरा होती. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात लहानसहान भूमिका करीत राजाभाऊंनी स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये एक महत्त्वाचा चित्रकर्ता म्हणून मान्यता मिळवली. या काळामध्ये राजा परांजपे यांनी मराठी चित्रपटांना आवश्यक असलेले नावीन्य तर दिलेच, त्याचबरोबर विषय आणि सादरीकरण यातही ताजेपणा आणला. रेखीव पात्ररचना आणि कल्पनापूर्ण दिग्दर्शन यांनी त्यांचे चित्रपट समृद्ध असत.

मिरज येथे २४ एप्रिल १९१० रोजी जन्मलेल्या राजा परांजपे यांचे बालपण पुण्यात गेले. शालेय शिक्षणात रस नसलेले राजाभाऊ त्याच वयात रंगभूमीकडे आकर्षित झाले होते. शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात बसवलेल्या माधवराव जोशी यांच्या 'विश्वैचित्र्य' नाटकात त्यांनी एक विनोदी भूमिका केली आणि प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

राजाभाऊ तारुण्यात आले, तो मूकपटांचा काळ होता. अशा मूकपटांना पार्श्वसंगीत देण्याच्या इराद्याने त्यांनी चित्रपटगृहामध्ये प्रवेश मिळवला आणि तेथून या माध्यमाशी त्यांचा संबंध जुळून आला. पडद्यावर पाहिलेली उत्तमोत्तम चित्रपटांतील पात्रे पाहून ते भारावून जात आणि त्यातून त्यांची अभिनयाची आवड अधिकच वाढत गेली. या काळात त्यांनी एस.व्ही. वर्तक यांच्या 'लपंडाव' नाटकात 'वाटाणे' नावाचे विनोदी पात्र रंगवले. यानंतर जोमाने पुढे येणार्‍या मराठी चित्रपटसृष्टीकडे ते आकर्षित झाले आणि त्यांनी बाबूराव पेंटर यांच्या 'सावकारी पाश'मध्ये पहिली भूमिका केली. या यशस्वी पदार्पणानंतर राजाभाऊंनी पेंटर यांच्याच 'प्रतिभा'मध्ये चकण्या मंडूकचे काम केले. यामध्ये केशवराव दाते आणि दुर्गा खोटे यांच्याही भूमिका होत्या. भालजी पेंढारकरांच्या 'गोरखनाथ'मधील परांजपे यांचा विनोदी भोलेनाथ चांगलाच गाजला. यामध्ये त्यांनी दोन गाणीही गायली.

अशा प्रकारे चित्रपटसृष्टीशी जवळीक साधलेली असताना त्यांना चित्रनिर्मितीच्या विविध बाबी समजून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली नसती तरच नवल होते. म्हणून त्यांनी भालजी पेंढारकर आणि मास्टर विनायक, तसेच 'नजम नक्वी', 'शोरी', 'वेदी' या हिंदी चित्रपट दिग्दर्शकांना साहाय्य केले. याचीच परिणती म्हणून राजा परांजपे यांना 'बलिदान' या पहिल्यावहिल्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची संधी मिळाली. यानंतर पुढच्याच वर्षी आलेल्या 'जिवाचा सखा'ने एका बाजूला रौप्यमहोत्सव साजरा केला, तर दुसर्‍या बाजूला राजा परांजपे, ग.दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांना एकत्र आणले.

एक यशस्वी चित्रकर्ता म्हणून कारकिर्द असलेल्या राजा परांजपे यांना प्रेक्षक आणि समीक्षक यांनी भरभरून दाद दिली. आपल्या चित्रपट कारकिर्दीमध्ये राजा परांजपे यांनी दोन राष्ट्रीय आणि चार राज्य चित्रपट पुरस्कार प्राप्त केले. ९ फेब्रुवारी १९७९ रोजी त्यांचे निधन झाले.

**-चंद्रशेखर जोशी**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# १० भारतीय प्रोटीनयुक्त पदार्थ, आहारात करा समावेश

प्रथिने आहारातील सर्वांत महत्त्वाचे मॅक्रोन्यूट्रिएंट्सपैकी एक आहेत. ती स्नायूंच्या निर्मितीमध्ये मोठी भूमिका बजावतात, रोगप्रतिकार शक्ती वाढवतात आणि त्वचा व केसांची देखभाल करतात. हजारो वर्षांहून अधिक काळापासून विविध प्रकारचे खाद्यपदार्थ असूनही अनेक अभ्यासांनुसार भारतीय लोक सर्वांत कमी प्रमाणात प्रथिनांचे सेवन करतात.



बहुतेक भारतीयांमध्ये प्रथिनांबद्दल अनेक सामान्य गैरसमज आहेत. आहारतज्ज्ञ व न्यूट्रिॲक्टिव्हेनियाच्या संस्थापक अवनी कौल यांचा सल्ला घेतला आणि भारतीयांच्या आहारात प्रथिनांची कमतरता का आहे आणि सामान्य गैरसमज यांवर चर्चा केली. त्यांनी लोकांच्या दैनंदिन प्रथिनांच्या गरजा पूर्ण करण्यास मदत करणारे अनेक प्रथिनांनी युक्त आहार सांगितला.

प्रथिने फक्त बॉडीबिल्डर्ससाठी आहेत. त्या सांगतात, तुमच्या शरीरातील प्रत्येक पेशीला प्रथिनांची आवश्यकता असते. फक्त बॉडीबिल्डर्सनेच नाही, तर प्रत्येक व्यक्तीने प्रथिनयुक्त पदार्थांचे सेवन करायला हवे.

डाळीमध्ये पुरेशी प्रथिने असतात. डाळ योग्य आहार आहे, परंतु त्यातील प्रथिने अपूर्ण आहेत आणि इतर कोणत्याही पदार्थाच्या मदतीशिवाय ती खाता येत नाही, असे त्यांनी सांगितले.

जास्त प्रथिने मूत्रपिंडांना हानी पोहचवतात. त्यांनी स्पष्ट केले की, प्रथिने केवळ आधीच मूत्रपिंडाचा आजार असलेल्या लोकांनाच हानी पोहोचवू शकतात; निरोगी व्यक्तींना नाही.

प्रथिनपूरक पदार्थ हे स्टिरॉइड्स आहेत. प्रथिनांच्या पावडरबद्दलची वस्तुस्थिती सांगताना त्या म्हणाल्या की, ते औषध नाही, तर केंद्रित अन्न आहे.

**शाकाहारी पर्याय**

पनीर भुर्जी मल्टीग्रेन पोळीसह, अंकुरलेले मूग चाट, सोया चंक करी ब्राऊन राईससह, पुदिन्याच्या चटणीसह बेसन पोळी, भाज्या टाकून बनवलेला क्विनोआ उपमा,

**मांसाहारी पर्याय**

मसाला ओट्ससह उकडलेली अंडीम, भाज्या टाकून बनवलेले ग्रिल्ड चिकन, ब्राऊन राईससह मच्छी करी, बाजरीची भाकरी आणि अंडा करी, नाचणीची भाकरी आणि मटण खिमा.

# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

## जाहीर प्रकटन

**(महाराष्ट्र महानगरपालिका आधिनयम कलम २१० अन्वेय)**

**जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/पनवेल/२५-२६/८५७/२०२५** **दिनांक : २१/०४/२०२५**

ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद हद्दीची सुधारित विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व्र. नगररचना अधिनियम, १९६६. मधील कलम ३१(१) अन्त्वये अधिसूचना क्र. वि. यो. पनवेल (सु.)/टीपीव्ही-३/१६-९३/१६७६, दिनांक १६ मार्च १९९३ अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त सुधारित विकास योजना दिनांक १५ मे १९९३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगरपरिषद हद्दीतील वगळलेल्या भागाची विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी अधिसूचना क्र. वि. यो. पनवेल (सु.) / ईपी / टीपीव्ही-३/५३-९४/२८२०, दिनांक २७ मार्च १९९४ अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त वगळलेल्या भागाची विकास योजना दिनांक ०१ जुलै १९९४ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगररचना परियोजना क्र.१ (प्र. फे.) अंतिम शासनाने दि. ३१/०८/२००९ रोजी मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३ च्या पोट कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप - २९१४/व्ही आय फी सं.क्र. ३०१/प्र.क्र. ३५४/नवि-२३, दि.२५ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनाकं १ ऑक्टोंबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिकेची सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमचे १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्र. ७२ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद सुधारित मंजूर विकास योजना व मंजूर नगररचना परियोजना मधील रस्ते सध्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने अरुंद आहेत व शहराची वाढती लोकसंख्या, वाहतूक व पार्कीगची गरज विचारात घेता उक्त रस्त्यांचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी,, पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. ८४/८३ पासून अंतिम भूखंड क्र. ९० पर्यंतचा विद्यमान ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता १२.२० मी. (४० फुट) करणे व पटेल मोहल्ला जामा मशीद पासून सि.टी. एस. नं. १११९ पर्यंतचा विद्यमान ७.६० मी. (२५ फूट) रूंदीचा रस्ता ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता करणेबाबत निर्णय पनवेल महानगरपालिका स्थायी समिती सभा ठराव क्र.१२६२, दि.०६/०२/२०२५ अन्वये झाला आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, ९.१४ चे कलम २१० अनुसरून खालीलप्रमाणे रस्ता रूंदीकरणास मान्यता देण्यात आली आहे आणि रस्ता रुंदीकरण दर्शविणारा नकाशा नागरीकांचे माहिती व अवलोकनार्थ सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देणेत आला आहे;

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | विद्यमान रस्त्याची रूंदी | प्रस्तावित रस्त्याची रूंदी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | मौजे- पनवेल येथील अं.भू.क्र ८४/८३ पासून अं.भू.क्र ९० पर्यंतचा रस्ता. | ९.१४ मी. (३० फुट) | १२.२० मी. (४० फुट) |
| २. | मौजे पनवेल येथील पटेल मोहल्ला जामा मशीद पासून न.भू.क्र. १११९ पर्यंतचा रस्ता. | ७.६० मी. (२५ फुट) | ९.१४ मी. (३० फुट) |

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, ज्यांना वरील फेरबदलाबाबत सूचना व हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी हे जाहीर प्रकटन महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झालेपासून तीस दिवसांचे आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावे. सद र प्राप्त सूचना व हरकती प्रस्तावांचा अंतिम मंजूरीच्या वेळी विचार करण्यात येईल व मुदतीनंतर प्राप्त हरकती सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**ठिकाण:- पनवेल**
**दिनांक : २१/०४/२०२५**

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**

### परिशिष्ट-अ
### रस्त्याचे संक्षिप्त विवरण

पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. ८४/८३ पासून अंतिम भूखंड क्र. ९० पर्यंतचा विद्यमान ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता १२.२० मी. (४० फुट) करणे व पटेलं मोहल्ला जामा मशीद पासून सि.टी.एस. नं. १११९ पर्यंतचा विद्यमान ७.६० मी. (२५ फुट) रूंदीचा रस्ता ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये नियमित रेषा विहीत करणे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | विद्यमान रस्त्याची रूंदी | प्रस्तावित रस्त्याची रूंदी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | मौजे- पनवेल येथील अं.भू.क्र ८४/८३ पासून अं.भू.क्र ९० पर्यंतचा रस्ता. | ९.१४ मी. (३० फुट) | १२.२० मी. (४० फुट) |
| २. | मौजे पनवेल येथील पटेल मोहल्ला जामा मशीद पासून न.भू.क्र. १११९ पर्यंतचा रस्ता. | ७.६० मी. (२५ फुट) | ९.१४ मी. (३० फुट) |

टीप:- वरील रस्ता रुंदीकरणाची प्रत्यक्ष आखणी करतेवेळी वरील बाधित जागेव्यतिरिक्त इतर जागा बाधित होत असल्यास सदरची जागा ही प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाचा भाग समजण्यात येईल.

### परिशिष्ट - ब -

प्रस्तावित रस्ता रुंदीकरण प्रत्यक्ष संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरीकांच्या पाहणी करीता सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

**ठिकाण:- पनवेल**
**दिनांक : २१/०४/२०२५**

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**

## PANVEL MUNICIPAL CORPORATION
## Public Notice

Maharashtra Municipal Corporation Act, 1949 Section 210

Outward No. PMC/TPD/Roads/Panvel/25-26/857/2025 Date-21/04/2025

Whereas, the Director of Town Planning, Maharashtra State in exercise of the powers conferred by section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Notification No.DP-Panvel (R)/TPV-3/16-93/1676, dated 16th march 1993, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan and the said Revised Development Plan come into force with effect from 15th May 1993;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State vide Notification No.DP-Panvel (R)/EP/TPV-3/53-94/2820, dated 27th April 1994, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan's Excluded Part Development Plan and the said Revised Development Plan's Excluded Part Development Plan come into force with effect from 01th July 1994;

And whereas, Panvel Municipal Council Town Planning Scheme (Ist Variation) Final sanctioned by Government dated 31th August 2009;

And whereas, the Government in exercise of the powers conferred by sub section 4 of section 3 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 vide Notification No. PNP.2914/VIP No.301/C.R. 354/UD-23, dated 25th September 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council and 29 surrounding revenue villages, which come into force with effect from 1st October 2016;

And whereas, Panvel Municipal Corporation has published its Revised and Draft Development Plan as per Section 26(1) of Maharashtra Regional and Town Planning Act-1966 in Maharashtra Extra Ordinary Gazette vide Extra Ordinary Gazette No. 72, Dated 08/08/2024;

And whereas, the roads shown in sanctioned development plan of erstwhile Panvel Municipal Council and Sanctioned Town Planning Scheme of Panvel town are narrow in consideration with existing heavy traffic and growing population of city, and needs to be widened;

And whereas, the existing 9.14 m wide road aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90 is decided to be widened to 12.20 m and existing 7.60 m wide road aligning from by Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119 is decided to be widened to 9.14 m Hon. Standing Committee, Panvel Municipal Corporation in exercise of the powers conferred by section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 vide Resolution No.1262, dated 06/02/2025;

Therefore, in accordance with Section 210 of the Maharashtra Municipal Corporatation Act, 1949, the following road widening has been proposed and it is kept open for the inspection of the public on all working days and in working hours in the office the of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation:

| Sr. No | Road Name | Existing Road width | Proposed Road width |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | Road Aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90, At-Panvel | 9.14 M (30 Feet) | 12.20 M (40 Feet) |
| 2. | Road Aligning from Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119, At-Panvel | 7.60 M (25 Feet) | 9.14 M (30 Feet) |

Any citizen, who want to submit any objection and/or suggestion about the proposed alignment of the road, he/ she may submit in writing within 30 days from the publication of this notice in Maharashtra Government Gazette. It shall be noted that, suggestion or objection if any, received by Panvel Municipal Corporation in writing within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette would only be considered. The suggestion/objection received after 30 days would not be considered;

**Place: - Panvel**
**Date-21/04/2025**

**sd/-**
**(Mangesh Chitale)**
**Commissioner**
**Panvel Municipal Corporation.**

### Schedule - A
### Description of Road

Road widening of the existing 9.14 m wide road aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90 is decided to be widened to 12.20 m and existing 7.60 m wide road aligning from Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119 is decided to be widened to 9.14 m under section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949.

| Sr. No | Road Name | Existing Road width | Proposed Road width |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | Road Aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90, At-Panvel | 9.14 M (30 Feet) | 12.20 M (40 Feet) |
| 2. | Road Aligning from Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119, At-Panvel | 7.60 M (25 Feet) | 9.14 M (30 Feet) |

Note:-Other than above listed final plot numbers, if any other final plot numbers existed while laying out the road widening then it will also be the part of the above proposed road widening.

### Schedule B

Plan showing final road widening line is kept open for Inspection in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation.

**Place: - Panvel**
**Date-21/04/2025**

**sd/-**
**(Mangesh Chitale)**
**Commissioner**
**Panvel Municipal Corporation.**

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१७०/१७३/२०२५**
**दिनांक :- २३/०४/२०२५**

# सहाण येथे वनवासी कल्याण आश्रमचे युवती चेतना शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र कोकण प्रांत कुलाबा जिल्हा यांच्या माध्यमातून जन शिक्षण संस्थान रायगड मुख्य कार्यालय सहाण अलिबाग येथे युवती चेतना शिबिर सोमवारी (दि. २२) हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचा भाग म्हणून जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून उपस्थित १०० हुन अधिक वनवासी युवती -भगिनींना विधी साक्षरता, सरकारी योजना, आरोग्य सेवा तसेच वारली चित्रकला विषयावर मार्गदर्शन देखील करण्यात आले. वनवासी युवती-भगिनींच्या मुख्य उपस्थितीत बंधू-भगिनींना महिला सक्षमीकरण, प्रेरणादायी कौशल्य विकास मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास बोर्ड मेंबर ॲड. निला तुळपुळे, जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय कोकणे, कोकण प्रांत महिला आयाम प्रमुख ज्योती पाटील, ज्योती जपे, प्राची आंग्रे, डॉ उत्तरा खाडीलकर, डॉ रेखा म्हात्रे. सुनंदा वाघमारे, तिका दातार, व सुचीता जोशी उपस्थित होते.




# जत्रोत्सवात मोफत पाणपोईचे आयोजन

**माणगाव : बातमीदार**

फाईव्ह स्टार मित्र मंडळातर्फे माणगांव जत्रे निमित्त श्री दत्त मंदिरात दर्शनास तसेच जत्रेत येणाऱ्या भाविकांसाठी आणि यात्रेकरूंसाठी मोफत पाणपोईचे आयोजन करण्यात आले होते. सध्या प्रचंड उष्णतामान असल्याने भाविकांची तहान भागविण्यासाठी तसेच भाविकांस जत्रोत्सवाचा आनंद मनमुराद घेता यावा यासाठी पहिल्यांदाच यंदाचे वर्षांपासून फाईव्ह स्टार मित्र मंडळाने थंड पिण्याच्या पाण्याच्या पाणपोई स्टॉलचे सुयोग्य नियोजन केले होते. या पाणपोईचे अनावरण मंगळवार दि.२२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता माणगांव नगरीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी माणगांव नगर पंचायतीचे पाणी पुरवठा सभापती कपिल गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र मोरे, ललित ओसवाल तसेच फाईव्ह स्टार मित्र मंडळाचे औदुंबर नरेंद्र गायकवाड, सुमित सूर्यकांत काळे, विजय बळीराम उभारे, योगेश अशोक सुर्वे, सागर यशवंत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन **श्री. गजानन भिवा पाटील व इतर** यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**-: मिळकत वर्णन :-**
**मौजे - पाटनोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**


| सर्व्हे/गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| २० | ६अ | ० हे - १४ आर- २० पॉ. | २ - ०० |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '१४ दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांकः- २४/०४/२०२५**

**सही/ -**
**ॲड. शैलेश मनोहर पांचाळ**
**पत्ता: शॉप नं. ०८, अंबिका आर्केड, लोखंडी पाडा, पनवेल कोर्टाजवळ, पनवेल ४१०२०६,**
**मो. ९१३६०४९७८८**

# रोहा वनविभाग उपवनसंरक्षक डॉ. शैलेंद्रकुमार जाधव



**माणगाव : बातमीदार**

भौगोलिक दृष्ट्या रायगड जिल्ह्यात वनविभाग दोन उपवनसंरक्षक विभागांमध्ये विभागलेला आहे त्यातील उत्तरेकडील अलिबाग वनविभाग आणि दक्षिणेकडील रोहा वनविभाग अशी प्रादेशिक कार्यक्षेत्रे आहेत. रोहा वनविभागात उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत यांच्या बदलीनंतर डॉ. शैलेंद्रकुमार जाधव यांनी रोहा प्रादेशिक विभागाच्या उपवनसंरक्षकपदी पदभार स्वीकारला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E –TENDER NOTICE( SECOND CALL)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E-Tender-45/IInd Call/2024-25 Dtd.24.04.2025 **RFx No.** – 7000035359 | **Sub:-**Invitation of SRM E-Tender for Removal of Grass (Kashed) under the corridor of 220kV/100kV EHV Lines under EHV (O&M) Division Mahad. | Rs.4,95,963/- (including GST + 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech//E-Tender-02/ IInd Call/2025-26 Dtd:-24.04.2025 **RFx No. –**7000035626 | **Sub:-** Second Call for SRM E-Tender for AMC for Air Conditioners at various substations under EHV (O&M) Dn.Mahad for the year 2025-26. | Rs.up to 7,50,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech//E-Tender-03/ IInd Call/2025-26 Dtd:-24.04.2025 **RFx No. –** 7000035632 | **Sub:-**Second Call for SRM E-tender for providing various consumable items for maintenance work at various Substations under EHV (O&M) Dn. Mahad 2025-26. | Rs. up to 8,45,113/- (Including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 24.04.2025 @ 00:00 hrs to 03.05.2025 @23:59Hrs for above tender
For further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

# निसर्ग संवर्धन कार्यात योगदान द्या

## नवी मुंबई मनपाकडून आवाहन | दिवाळे जेट्टी येथे खाडीकिनारी स्वच्छता मोहीम

### जागतिक वसुंधरा दिन कार्यक्रमांचा आरंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या वातावरणात होणाऱ्या बदलामुळे प्राणी जीवनाला व निसर्गाला मोठया प्रमाणावर धोका निर्माण झाला असून ते रोखण्यासाठी निसर्गातील पृथ्वी, वायू, अग्नी, जल व आकाश या पंचतत्वांचे संरक्षण करणे महत्वाचे आहे. हीच भूमिका नजरेसमोर ठेवून आजच्या जागतिक वसुंधरा दिनानिमित्त आपण प्रत्येकाने वसुंधरेचे संरक्षण व संवर्धन हे आपले कर्तव्य असल्याचे लक्षात घेत आपल्या परीने निसर्ग संवर्धन कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी केले.

वसुंधरा दिनाचे औचित्य साधून दिवाळे येथील जेट्टी नजिकच्या खाडी परिसरात राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहीमेवेळी ते बोलत होते. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने २२ एप्रिल रोजीच्या जागतिक वसुंधरा दिनापासून १ मे रोजीच्या प्रदूषणमुक्त महाराष्ट्र दिनापर्यंत जाहीर करण्यात आलेल्या विशेष उपक्रमांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महागरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.



त्यामधील आजच्या स्वच्छता मोहीमेत महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छतामित्र यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ आणि नेरुळच्या एसआयईएस महाविद्यालयाच्या एनएसएस विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन खाडी किनारा परिसराची स्वच्छता केली.

या वेळी सर्वांनी जेट्टी जवळील पाणथळ भाग तसेच खारफुटी नजीकचा भाग याठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविली. विशेषत्वाने प्लास्टिकचे तुकडे, मासे पकडण्याच्या जाळीचे तुकडे, प्लास्टिकच्या बाटल्या व काचेच्या बाटल्या गोळा करण्यात आल्या. तसेच कचराही संकलीत करण्यात आला. हा मोठया प्रमाणात जमा झालेला कचरा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे वाहून नेण्यात आला.

खाडीच्या भरतीसोबत पाण्यातून मोठ्या प्रमाणावर कचरा किनाऱ्यालगत येत असतो. अशा कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या दृष्टीने समुद्र, खाडी, तलाव अशा जलस्त्रोतांमध्ये कचरा टाकून जलाशयातील जैव सृष्टीला धोका पोहचतो हे लक्षात घेऊन नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा कचरा जलस्त्रोतांमध्ये टाकू नये असे आवाहन खाडी किनारा सफाई केल्यानंतर उपस्थितांना व नागरिकांना करण्यात आले.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्यासह उपस्थित सर्वांनी 'माझी वसुंधरा' अभियानाची सामुहिक शपथ ग्रहण केली. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभाग परिमंडळ १ चे उपायुक्त डॉ. अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता राजेश पवार, स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता निरीक्षक सर्वश्री विजय नाईक, अजित तांडेल, लवेश पाटील, संजय पाटील, महेश मोरे व रत्नमाला नाईक तसेच स्वच्छताकर्मी आणि दिवाळे ग्रामस्थ मोठया संख्येने सहभागी झाले होते. विशेषत्वाने एसआयईएस महाविद्यालय नेरुळ येथील एनएसएस विद्यार्थी समूहाने या स्वच्छता मोहीमेत उत्साहाने सहभाग घेऊन ही मोहीम यशस्वीरित्या पार पाडली.

**१ मेपर्यंत विविध कार्यक्रम**

१ मे पर्यंत वसुंधरा संरक्षण व संवर्धन विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून 'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' या ब्रीदवाक्याला अनुरुप स्वच्छता, प्लास्टिक प्रतिबंध, कचऱ्याचा कमीतकमी वापर – पुनर्वापर – पुनर्प्राक्रिया अशा 'थ्री आर' नुसार अंमलबजावणी, वृक्षारोपण व संवर्धन असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमांमध्ये नागरिकांनी व विशेषत्वाने विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# म्हातवलीतील आरएमसी प्लांटच्या तपासणी अहवालानंतर कारवाई

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील म्हातवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत आणि उरण ओएनजीसी प्रकल्पालगतच्या नागरी वस्तीत असलेल्या आरएमसी प्रकल्पाची क्षेत्र अधिकारी यांच्याकडून तपासणी करून कारवाई करण्याचे आदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिले आहेत.



भर नागरी वस्तीत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात उडणाऱ्या धुळीमुळे नागाव, म्हातवली या दोन्ही ग्रामपंचायतीमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवून हजारो नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक बनलेल्या आरएमसी प्लांटवर कारवाई करण्याची मागणी नागाव–म्हातवली मधील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

नागाव–म्हातवली ग्रामस्थांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू पाहाणाऱ्या या आरएमसी प्लांट सुरू करण्यासाठी म्हातवली ग्रामपंचायतीने ना–हरकत प्रमाणपत्र दिले असल्याची माहिती म्हातवली ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी ज्योती फोफेरकर यांनी दिली. तसेच येथील विहिरी संदर्भात नागाव आणि म्हातवली या दोन्ही ग्रामपंचायतीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आरएमसी प्लांटमध्ये दोन व तीन नंबरची खडी, ग्रीटसॅण्ड बनविण्यात येत आहे. खडी, ग्रीटसॅण्ड बनविताना नागाव– म्हातवली ग्रामपंचायतीच्या परिसरात धुळीचे लोट उठतात.

परिसरात पसरणारे धुळीचे साम्राज्य आणि कर्णकर्कश आवाजामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. याआधीच ओएनजीसीच्या प्रकल्पाच्या वाढत्या हवेतील प्रदूषणामुळे याआधीच परिसरातील नागरिक त्रस्त आहेत. त्यामध्ये आता नव्याने सुरू झालेल्या आरएमसी प्लांटची भर पडली आहे. या आरएमसी प्लांटमुळे सभोवताली धूळ आणि आवाजाने म्हातवली–नागाव ग्रामस्थ त्रासले आहेत.

दरम्यान, या प्लान्टची तातडीने तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती उरणचे तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली. म्हातवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुरू असलेला आरएमसी प्लांट कायदेशीर की बेकायदेशीर आहे याची प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्र अधिकारी यांच्याकडून तपासणी करून त्यांच्या अहवालानंतर कारवाई करू, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी विक्रांत भालेराव यांनी दिली.

# राष्ट्रीय जनसंपर्क दिवस उत्साहात साजरा

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय), मुंबई विभागाच्या वतीने प्रेस क्लबमध्ये कृत्रिम बुध्दिमत्तेचा जबाबदार वापर : जनसंपर्काची भूमिका या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




या वेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी सांगितले की, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुध्दिमत्ता हे व्यवस्थापन व संवाद क्षेत्रात एक प्रभावी साधन ठरत आहे. जनसंपर्क क्षेत्र हे विश्वासावर चालते. कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय) आणि चॅटजीपीटी आदीसारख्या तंत्रज्ञानांनी मोठा बदल घडवून आणला आहे. एआय, चॅटजीपीटी, कॅनव्हा आदी सगळी साधने आहेत, याचा वापर योग्यरित्या करायला शिका. या साधनांचा उपयोग करून जनसंपर्क क्षेत्रातील कामे अधिक चांगली आणि प्रभावीपणे करावीत.

या कार्यक्रमाला अतिथी वक्ते द इकॉनॉमिक टाईम्सचे कार्यकारी संपादक मुकबिल अहमर, पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई विभागाच्या अध्यक्ष अनिता श्रीवास्तव, उपाध्यक्ष राजेश परिडा, सचिव डॉ. मिलिंद आवताडे, खजिनदार अमलान मस्कारेनहास, मुंबई विद्यापीठाच्या जनसंज्ञापन विभागाच्या प्रा. दैवता पाटील, जनसंपर्क आणि पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवर, पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

कृत्रिम बुध्दिमत्ता एक वेगळेच पाऊल आहे. कारण पहिल्यांदाच एखाद्या तंत्रज्ञानाला निर्णय घेण्याची क्षमता आहे. संगणक टाईपरायटरची जागा घेऊ शकतो, पण तो मानवी आदेशावर चालतो. 'एआय' मात्र स्वतः शिकतो आणि निर्णय घेतो. जगातील ६० देशांनी राष्ट्रीय एआय धोरण तयार केले आहे, असे मुकबिल अहमर यांनी सांगितले. प्रास्ताविक अनिता श्रीवास्तव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दैवता पाटील यांनी तर आभार डॉ. मिलिंद आवताडे यांनी मानले.

# रसायनी कॉर्नर ते रेल्वे स्टेशन रस्त्याचे काम महिनाभरात सुरू होणार; पीडब्यूडीचे पत्र

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी कॉर्नर ते रेल्वे स्थानक रस्त्याची दुरावस्था झाल्याने प्रवासी व नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हा रस्त्याची लवकरात लवकर डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली होती. दुरुस्ती संदर्भात योग्य ती कार्यवाही न केल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रस्त्याचे काम महिनाभरात सुरू करू, असे पत्र देण्यात आले आहे.



रसायनी कॉर्नर ते रसायनी रेल्वे स्थानक रस्त्याची दुरावस्था झाल्याने प्रवासी व नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रहदारीच्या रस्त्याची दुरावस्था झाल्याने वाहनांचे नुकसान होत असून अपघातांची संख्याही वाढली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुभाष कोकणे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व इतरत्र अर्ज केला होता, परंतु दोन महिने होवूनही कोणतीही कार्यवाही नसून हा रस्ता जैसे थेच आहे. प्रशासनाने रस्ता दुरुस्ती संदर्भात योग्य ती कार्यवाही २१ एप्रिल २०२५ पर्यंत न केल्यास तुराडे, कष्टकरी नगर आणि जुनी पोसरी येथील नागरिक आणि बजरंग दल २२ एप्रिल २०२५ रोजी तीव्र आंदोलन करतील असा इशारा आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी होता. याबाबतचे वृत्तही वर्तमानपत्रांतून प्रकाशन झाले होते. हे आंदोलन होवू नये यासाठी रसायनी पोलीस व सार्वजनिक बांधकाम विभागाने सोमवारी सायंकाळी बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांना चर्चे ला बोलावून दांड तुराडे आपटा रस्ता १०७ वरील बायपास रसायनी कॉर्नर ते रसायनी रेल्वे स्थानक ० ते २/२०० रस्ता डांबरीकरण करारनामा क्र.B9/HO/२५८ रस्ता महिनाभरात काम सुरू करतो, असे लेखी पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी मिलिंद कदम यांनी दिले.

रस्त्याच्या डांबरीकरणासाठी बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी आवाज उठविल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भारत अतिरेक्यांना जशास तसे उत्तर देईल –उपमुख्यमंत्री शिंदे

**नवी मुंबई : बातमीदार**

काश्मीरमध्ये जो हल्ला झाला या भास हल्ल्याला भारत जशास तसे उत्तर देईल. या अतिरेक्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानची मस्ती पंतप्रधान मोदी व अमित शहा उतरवण्याशिवाय राहणार नाही. आपले जवान त्यांना अद्दल घडवतील हा विश्वास भारतीयांना आहे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. ते नवी मुंबईत वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहातील निर्धार मेळाव्यात बोलत होते.



या वेळी नवी मुंबईतील मविआच्या १२ माजी नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला.

मुख्यमंत्री झाल्यावर मी पायाला भिंगरी लावल्यासारखा फिरलो. जनतेची कामे केली. खुर्चीचा वापर फक्त जनतेच्या कामांसाठी केला असे देखील ते म्हणाले. असा एकही दिवस जात नाही की त्या दिवशी प्रवेश होत नाही. इतिहासात इतके निर्णय घेण्याचे धाडस कोणीही केले नव्हते ते मी मुख्यमंत्री असतात केल्याचे शिंदे म्हणाले. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना, ते फक्त दिवसरात्र जळत असतात. त्यांना मला शिव्या देण्याशिवाय काहीही सुचत नसल्याची टीका त्यांनी केली. लाडकी बहीण योजना कधीच बंद होणार नाही, त्यामुळे विरोधकांच्या अफवांवर विश्वास ठेवू नका, असेदेखील एकनाथ शिंदे म्हणाले.

जनतेने कधी वर्षा बंगला पाहिला नव्हता. माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात नागरिक सहज वर्षा बंगल्यावर या जा करत होते. त्यांची कामे करत होते. इतकी गर्दी करत होते. की काहींच्या पाठीवर त्यांनी दिलेल्या निवेदनावर सही करून त्यांची कामे केल्याचे शिंदे म्हणाले. राज्यात आपण युतीत लढत आहोत. त्याप्रमाणे पालिका निवडणुकांत देखील युतीत लढू असे शिंदे म्हणाले.

यांचा जीव मुंबई पालिकेत अडकला आहे. मुंबईचे रस्ते स्वच्छ आपण केले. अन्यथा यांनी फक्त ओरबडण्याचे प्रयत्न केले. मुंबई लुटली यांनी. मुंबई सोडून गेलेल्यांना आपण पुन्हा मुंबईत आणतोय. तसे गृह धोरण आपण ठरवतोय असे म्हणत शिंदे यांनी ठाकरेंवर टीका केली.

# महावितरण कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरण नेरूळ विभागातील सर्व उपविभागीय अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंते, शाखा अभियंते, तांत्रिक/अतांत्रिक कर्मचारी, बाह्यस्रोत तसेच लेखा व मानव संसाधन कर्मचाऱ्यांनी आर्थिक वर्ष २०२४–२५ या वर्षात केलेल्या उत्तम कामगिरी केली. त्याबद्दल महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता सुनील काकडे, अधीक्षक अभियंता सतीश सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली नेरूळ विभागाचे कार्यकारी अभियंता सुहास बेडगकर यांच्या हस्ते त्यांचा ट्रॉफी व प्रशस्ती पत्रक देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमास महावितरण नेरुळ विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. ग्राहकांस अविरत सेवा देण्याचे वचन त्यावेळी त्यांनी वरीष्ठ अधिकाऱ्यांना दिले. या वेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता रमेश कावळे, विनायक बुधवंत, कासल व नानोटे यांनी सुद्धा उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# रविवारी मराठा समाजाचा वधू-वर-पालक परिचय मेळावा

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथे रविवारी (दि.२७) सकाळी १० वाजता सकल मराठा समाजाचा मराठा वधु–वर, थेट–भेट व पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला राज्यभरातून रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, नवी मुंबई, मुंबई,पुणे व इतर जिल्ह्यातून सुमारे शेकडो वधू–वर व त्यांचे पालक येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



शहरातील कर्नाटक संघ पनवेल, प्लॉट नं.२९, सेक्टर २, नविन पनवेल येथे हा मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. या मेळाव्याचे आयोजन सकल मराठा सोयरीक ग्रृपच्या राज्याध्यक्षा, शिवमती मायाताई दत्तात्रय जगताप पाटील,जिजाऊ ब्रिगेड अंतरराष्ट्रीय उपाध्यक्षा शिवमती संपुर्णाताई सावंत,शिवमती आयोध्याताई जगताप यांनी सगेसोयरे वधु–वर सेवा केंद्र, सकल मराठा सोयरीक ग्रृपच्या माध्यमातून या मेळाव्याचे आयोजन केले असून, शिवश्री हरीभाऊ जगताप पाटील सर्व सहकार्यांनी मेळावा यशस्वी होण्यासाठी सर्वदूर संपर्क दौरा केला आहे.

पाहणी संपर्क परिचयातून मेळाव्यातच २० ते २५ विवाह मार्गी कसे लागतील, यासाठीसुध्दा आयोजकांचा प्रयत्न असणार आहे. या शिवाय, या मेळाव्यात विवाहासाठी समुपदेशन, वधु–वर परिचय, विवाह संस्कार महत्त्व, उपवर मुले मुली व संबंधित पालकांना समुपदेशन, विवाहात येणारी अडथळे, विवाह समस्यांवर मार्गदर्शन, उपवर मुले, मुली यांना विवाह ठरवताना घ्यावयाची काळजी व त्यावर मार्गदर्शन तसेच अविवाहित, घटस्फोटीत, विधवा, विधुर यांच्यासाठी स्थळे उपलब्ध असून, विवाह पूर्व व विवाहोत्तर येणार्या समस्यांवर पालक कुटुंबीयांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या वेळी शिवश्री. शहाजीराजे भोसले,संस्थापक अध्यक्ष ई एम पॉवर ग्रुप रायगड जिल्हा, प्राचार्य हनुमंत चव्हाण, शिवमती, रेवती कदम रायगड/सिंधुदुर्ग जिजाऊ ब्रिगेड विभागीय अध्यक्ष यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. वधु व वरांचा परिचयाबरोबरच कुंडली गुणमिलन, नाडीदोष,ब्लडग्रुप, मंगळ ई.अधश्रध्दावरील शास्त्रीय मार्गदर्शन याबाबतही मान्यवर समाजाला प्रबोधन करणार आहेत. पालकांना एकाचवेळी एकाच ठिकाणी शेकडो स्थळे पाहण्याची/प्रत्यक्ष भेटण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त नावे नोंदविण्यासाठी वधु–वर व पालक मेळावा समितीमधील स्वयंसेवक सदस्य हे प्रयत्न करत आहेत.

वधू–वर व पालक यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बाबा सावंत (दक्षिण मध्य मुंबई), सुनील कोठावळे (दक्षिण मुंबई), काशिनाथ चोरगे (दक्षिण पूर्व मुंबई), सुदाम साहिल (पश्चिम मध्य मुंबई), मिलिंद कदम (ईशान्य मुंबई), सुरेश पवार (उत्तर मध्य मुंबई), तेजस भोईर (पालघर), अमित केळकर (ठाणे मध्य), चंद्रशेखर पवार (ठाणे पश्चिम), मारूती खुटवड (नवी मुंबई), परमानंद जांभळे (रायगड उत्तर), विक्रांत वाठोरे (रायगड दक्षिण), भरत सरपरे (रत्नागिरी), रमेश चौधरी (ठाणे), ग्रामविस्तार अधिकारी भोलेनाथ जगताप, तानाजी भोसले व इतर समिती सदस्यांनी केले असून अधिक ९६८९०४७२७० या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# काश्मिर हल्ला : सानपाडा येथे निषेध

**नवी मुंबई : बातमीदार**

काश्मिर मधील पहेलगाम या ठिकाणी काल दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध सानपाडा जेष्ठ नागरिक संघाने केला आहे. या वेळी या हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या संघाचे सदस्य, काश्मिरमध्ये सेवा बजावलेले आणि दहशतवाद्यांशी लढताना उजव्या हाताची दोन बोटे गमावलेले भारतीय सेनेतील निवृत्त हवालदार श्री संजय पवार यांनी यावेळी भारतीय जवानांना काश्मिर मध्ये कशा परिस्थितीत सेवा बजवावी लागते, हे स्वानुभव विषद करून आपण आमने सामने युद्ध केल्यास कधीच जिंकू शकणार नाही, याची पूर्ण कल्पना असल्यानेच पाकिस्तान असे भ्याड हल्ले करीत असतो, असे सांगितले.

संघाचे उपाध्यक्ष विठ्ठलराव गव्हाणे या वेळी बोलताना म्हणाले की, काल टिव्ही वर पहेलगामची परिस्थिती पाहताना अंगावर भीतीने शहारे आले, कारण बरोबर दोन वर्षांपूर्वी आम्ही काही मंडळी नेमके त्याच जागी होतो, याची राहून राहून आठवण येत होती. संघाचे खजिनदार व्हि जी मुखेकर यांनी ते पोस्ट खात्यात असताना काश्मिरमधील सहलीत, अमरावती येथील जवान भेटल्यावर त्याच्याशी झालेला संवाद कथन करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले जवान,आपले रक्षण करीत असतात. याची आपण सदैव जाणीव ठेवली पाहिजे,असे आवाहन केले.

संघाचे अध्यक्ष मा ना कदम या वेळी बोलताना म्हणाले की, देश विदेशातील पर्यटक घाबरून जाऊन काश्मीर मध्ये येऊ नये म्हणून दहशवाद्यांनी हा हल्ला केला आहे, पण आपण त्यांचा हा डाव उलटवून लावण्यासाठी, न भिता अधिकाधिक संख्येने काश्मिर मध्ये जात रहाणे आवश्यक आहे.यावेळी अत्यंत त्वेषाने देण्यात आलेल्या देशभक्ती पर घोषणांनी सर्व परिसर दणाणून गेला होता.

# पहलगाम पर्यटक हत्याकांडाचा पोलादपूर व खोपोलीत तीव्र निषेध



**पोलादपूर : प्रतिनिधी**

काश्मीर मधिल पहलगाम येथे पर्यटनात गेलेल्या ३० भारतीय निष्पाप नागरीकांचे अमानुषपणे हत्याकांड करण्यात आले. या घटनेचे तीव्र पडसाद देशभर उमटत असताना पोलादपूर शहरात देखील या हिंसाचाराचा तेवढे निषेध करण्यात आला.

मंगळवारी झालेल्या पहेलगाम येथील पर्यटक हत्याकांडामध्ये महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. या घटनेमध्ये नाव, जात, धर्म विचारून पर्यटकांची हत्या करण्यात आली. यामुळे देशभरात तीव्र संतापाच्या भावना व्यक्त होत असताना पोलादपूर शहर देखील याला अपवाद राहिले नाही. पोलादपूर नगराध्यक्ष शिल्पा दरेकर, नगरसेविका अस्मिता पवार, स्नेहा मेहता, माझी उपनगराध्यक्ष नागेश पवार, स्वीकृत नगरसेविका मृगया शहा, राष्ट्रवादी काँग्रेस विरोधी गटनेते नगरसेवक दिलीप भागवत, स्वप्निल भुवड, अमर नगरकर, भाजपचे नामदेव मोरे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, दीपक उतेकर, माजी नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, संजय कळंबे तसेच असंख्य तरुण पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यासमोर निदर्शने करून पोलादपूर तहसील कार्यालयापर्यंत निषेधाच्या घोषणा देत मोर्चा काढून पहलगाम हत्याकांडाचा निषेध केला.

पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांना निषेध मोर्चानंतर निवेदन देऊन पोलादपूरकरांच्या भावना केंद्र सरकारपर्यंत पोहचवण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी तहसीलदार घोरपडे यांनी मोर्चेक्रयांच्या भावना केंद्र सरकार परत पोहोचवण्याची ग्वाही दिल्यानंतर निषेध मोर्चाचा समारोप झाला.

**खोपोली: प्रतिनिधी**

काश्मीरमधील पुलगाव येथील अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा खोपोलीत डोंबिवली नागरी सहकारी बँकेने जाहीर निषेध केला

पुलगाव येथे केलेल्या अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात अनेक निरपराध पर्यटकांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले या पार्श्वभूमीवर खोपोलीत डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या उपस्थितीत फलक घेऊन जाहीर निषेध व्यक्त केला. यावेळी अतिरेक्यांचा केंद्र शासनाने योग्य तो बंदोबस्त करावा, अशी या वेळी उपस्थितानी मागणी केली.

यावेळी हल्ल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांना मुक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. खोपोली शाखेचे व्यवस्थापक पुष्कराज स्वामी त्यांच्या नेतृत्वाखाली विक्रम मुंडिक, मंदार मुळे, चित्रा ठाकूर, अरविंद भोर, निलेश महाजन, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष राजेंद्र पेठे, अक्षय फाटक, नरेंद्र हार्डीकर, दातार त्याचप्रमाणे बाजारपेठेतील व्यवसायिक व नागरी उपस्थित होते.




## धुरांच्या लोटांतून झेप घेत जंगल वाचवले!

माणगावच्या वनरक्षकांची मध्यरात्रीची धाडसी कामगिरी



**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील साळवे येथील संरक्षित वन क्षेत्रात २२ एप्रिल रोजी रात्री १० वाजता अचानक लागलेल्या भीषण वणव्यामुळे परिसरात धुरांचे लोट उठले आणि वनसंपदेवर गंभीर धोका निर्माण झाला होता. या घटनेची माहिती मिळताच प्रशांत शिंदे वनक्षेत्रापाल माणगाव यांचे मार्गदर्शन खाली वनरक्षक वैशाली भोर यांनी तात्काळ पथक सज्ज करून पवन चौधरी, दुर्गेश पाटील, राणी लिंबोरे आणि स्वप्निल मस्करे यांच्यासह घटनास्थळी धाव घेतली. मध्यरात्री झाडाझुडपांतून वाट काढत त्यांनी जीव धोक्यात घालून अथक प्रयत्नांतून आग पूर्णपणे आटोक्यात आणली.

वणवा वाऱ्यामुळे झपाट्याने पसरत होता, त्यामुळे अनेक वन्य प्राणी, औषधी वनस्पती आणि जैवविविधतेवर संकट निर्माण झाले होते. साधनांची कमतरता असूनही पथकाने आपल्या अनुभव, प्रशिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर ही आग नियंत्रणात आणली आणि मोठा अनर्थ टळला. या धाडसी कार्याबद्दल गावकऱ्यांनी वनरक्षकांचे भरभरून कौतुक केले असून जिल्हाभरातून वनविभागाच्या तत्परतेचे अभिनंदन केले जात आहे.

यानंतर वनविभागाने जंगलात अनधिकृत प्रवेश व उघडचा आगी लावणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला असून स्थानिक पातळीवर जनजागृतीसाठी विशेष मोहिम राबवण्याची तयारी सुरू आहे. या घटनेतून वनसंवर्धन आणि जैवविविधतेचे महत्व अधोरेखित झाले असून वनरक्षक व मजुरांचे कार्य खरंच सलाम करण्याजोगे आहे.

# रायगड जिल्ह्यात सरपंचपदांची आरक्षण सोडत जाहीर

## मुरुड तालुक्यातील १२ ग्रामपंचायतीवर महिला राज

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पंचायत समिती कार्यालयातील श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात उपविभागीय अधिकारी अलिबाग- मुकेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता राजकीय पक्षाचे कार्यकर्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत तालुक्यातील २४ ग्रामपंचायतीच्या सरपंच पद आरक्षण सोडत २०२५ ते २०३० याकरिता आरक्षण सोडत बैठक संपन्न झाली. कु.देवाशु सोनावणे या लहान मुलांने आरक्षणाची चिठ्ठी काढली. या आरक्षण सोडीत २४ ग्रामपंचायत पैकी १२ ग्रामपंचायतीवर महिला आरक्षण आल्याने अनेक इच्छुकांचे सरपंच होण्याचे स्वप्न भंग झाले.



यावेळी अलिबाग उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, मुरुड उपविभागीय अधिकारी दुर्गा देवरे, तहसीलदार रोहन शिंदे, पंचायत समिती विस्तार अधिकारी अशोक दांडेकर,नायब तहसीलदार संजय तवर, वरिष्ठ लिपिक प्रतिक पावसकर,नायब तहसीलदार डि.एम .महाले आदिंसह राजकीय पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी तालुक्यातील ४ ग्रामपंचायतींचे आरक्षण काढण्यात आले होते. परंतु या ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या नाही आहेत. त्यामुळे आता काढण्यात आलेले आरक्षण धरणार की, आधीचे धरणार या विषयावर आक्षेप घेतला.यावेळी उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.तसेच तुम्ही या संदर्भात लेखी निवेदन द्या आम्ही जिल्हाधिकारी साहेबांच्या माध्यमातुन राज्य निवडणूक आयोगाला कळवु असे सांगण्यात आल्याने राज्यकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना यावेळी समाधान व्यक्त केले.

अ.क्र ग्रामपंचायतीचे नाव २०२५-३० सरपंच आरक्षण पुढील प्रमाणे - उसरोली ग्रामपंचायत -सर्वसाधारण महिला ,विहुर ग्रामपंचायत -अनु.जाती (महिला),तळेखार ग्रामपंचायत - अनु.जमाती,मिठेखार ग्रामपंचायत -नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,वावडुंगी ग्रामपंचायत - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग भोईघर ग्रामपंचायत - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग मांडला ग्रामपंचायत -नागरिकांचा मागास प्रवर्ग मजगांव ग्रामपंचायत -सर्वसाधारण महिलाआंबोली ग्रामपंचायत - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला शिघ्रे ग्रामपंचायत- सर्वसाधारण महिला वेळास्ते ग्रामपंचायत- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला कोर्लई ग्रामपंचायत - सर्वसाधारण साळाव ग्रामपंचायत - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला आगरदांडा ग्रामपंचायत - सर्वसाधारण नांदगाव ग्रामपंचायत - सर्वसाधारण महिला वळके ग्रामपंचायत- अनु.जमाती (महिला)तेलवडे ग्रामपंचायत- सर्वसाधारण चोरढे ग्रामपंचायत- सर्वसाधारण (महिला)काशिद ग्रामपंचायत- सर्वसाधारण सावली ग्रामपंचायत- सर्वसाधारण बोर्ली ग्रामपंचायत- अनु.जमातीराजपुरी ग्रामपंचायत - अनु.जमातीएकदरा ग्रामपंचायत- अनु.जमाती (महिला) काकळघर ग्रामपंचायत- सर्व साधारण असणार आहे.

यावेळी उपस्थित महिलांनी या आरक्षण सोडतीत बाबत समाधान व्यक्त केले.

## खालापूर तालुक्यातील ४५ ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण

**चौक,खोपोली :प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ४५ ग्राम पंचायत सरपंच पदाचे आरक्षण आज उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आले.खालापूर तालुक्यातील ४५ ग्राम पंचायत पैकी ४० ग्राम पंचायत यांच्या निवडणुका मागील दोन वर्षांत पूर्ण झाल्या असून उर्वरित ५ ग्राम पंचायत यांचे आरक्षण रद्द करण्यात आले आहे. हे थेट सरपंच पदाचे आरक्षण सन २०२५ ते २०३० या कालावधीत होणाऱ्या ग्राम पंचायत निवडणुकीसाठी आहे.



ग्रुप ग्रामपंचायत साजगाव येथे अनुसूचित जाती महिला तर तुपगाव हे अनुसूचित जाती खुल्या साठी राखीव ठेवण्यात आली आहे. अनुसूचित जमाती साठी बोरगाव खुर्द, कलोते, वावर्ले,नारंगी,जांबरुंग तर महिला अनुसूचित जमाती साठी वरोसे, माडप,उंबरे,दुरशेत, वावोशी या पाच ग्राम पंचायत यांची सोडत निघाली आहे.तर नागरिकांच्या मागास प्रवर्गातून सर्व साधारण चावणी,ठाणेन्हावे, इसांबे, नदनपाडा,देवन्हावे, जांभीवली तर महिला नागरीकांच्या प्रवर्गासाठी टेंभरी, तांबाटी, होनाड,चांभारली,शिरवली, वडगांव या सहा ग्राम पंचायत यांची सोडत निघाली आहे.

सर्व साधारण मधून २१ सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले असून यात सर्व साधारण महिलांसाठी बिडखुर्द, आसरे, नावंढे, वावंढळ,माणकिवली, हाल खुर्द,सावरोली,वडवळ, गोरठण बुद्रुक व कुंभिवली या दहा ग्राम पंचायत यांची सोडत निघाली.खानाव,खरीवली, लोधीवली,आपटी, नडोदे,चौक, होराले, आतकरगाव,चिलठण, माजगाव, वासंबे या ग्राम पंचायत सर्व साधारण जागेसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले.

आरक्षणाच्या चिठ्ठी कुमार अर्णव सावंत यांनी काढल्या. यावेळी तहसीलदार अभय चव्हाण, गटविकास अधिकारी संदीप कराड, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, नायब तहसीलदार विकास पवार, गट शिक्षण अधिकारी कैलास चोरमले यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते

## उरण तालुक्यात ३५ सरपंचपदाचे आरक्षण

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या २०२५ ते २०३० दरम्यान होणाऱ्या सरपंच पदाच्या निवडणुकांसाठी आरक्षण सोडत २३ एप्रिल रोजी काढण्यात आली.जेएनपीएच्या कामगार वसाहतीतील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या आरक्षण सोडतीसाठी प्रांत अधिकारी पवन चांडक, उरणचे तहसिलदार डॉ.उध्दव कदम, विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य, विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होते.

पुढील पाच वर्षांसाठी सरपंच पदासाठी आरक्षण खालील प्रमाणे सोडत पद्धतीने आरक्षण जाहीर झाले असल्याची माहिती उरण तहसिलदार डॉ.उध्दव कदम यांनी दिली आहे.

**सरपंच पदासाठी आरक्षण ग्रामपंचायतीचे नाव.**

१) सर्वसाधारण - कोप्रोली, भेंडखळ, जसखार, घारापुरी, वशेणी, आवरे, नवीनशेवा, चिरनेर,दिघोडे, नवघर, धुतुम

२) सर्वसाधारण महिला - विंधणे,सारडे, पागोटे, बांधपाडा, फुंडे, गोवठणे, पाणजे, पुनाडे, करळ, नागाव, डोंगरी.

३) नामाप्र - वेश्वी, बोकडविरा, सोनारी, कळंबुसरे, ४) नामाप्र महिला - हनुमान कोळीवाडा, पिरकोन, म्हातवली, जुई, केगांव, ५) अनुचित जाती - जासई६) अनुसूचित जमाती - रानसई, चिर्ले. ७) अनुसूचित जमाती महिला - चाणजे.

## तळा तालुक्यात १३ ग्रामपंचायतीवर महिलाराज



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील २५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत २३ एप्रिल २०२५ रोजी डॉ. श्री.नाना साहेब धर्माधिकारी सभागृह तळा येथे प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी जाहीर केले.

यावेळी नायब तहसीलदार पालांडे, निवडणूक नायब तहसीलदार संजय टेंबे, निवडणुक निरीक्षक. शेगावकर, गटविकास अधिकारी महादेव शिंदे,अनेक पक्षांचे पक्षप्रमुख ,कार्यकर्ते व विविध गावातील सरपंच पदाचे ईच्छुक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आरक्षण सोडतीमध्ये कही खुशी कही गम असे चित्र दिसले.

२०२५ ते २०३० या कालावधीमध्ये २५ ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जातीसाठी २ जागा, अनुसूचित जमाती साठी ४ जागा, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ७ जागा सर्वसाधारणसाठी १२ जागा असे २५ ग्रामपंचायतीचे आरक्षण निश्चित करण्यात आले यामध्ये

निगुडशेत-अनु. जाती महिला, वांजळोशी - अनु. जाती, मेढे - अनु. जमाती, बोरघर हवेली-अनु. जमाती, महागाव-अनु. जमाती महीला, पिटसई-अनु. जमाती महीला, मालुक - ना.मा.प्र, वरळ-ना.मा.प्र. महिला, चरई खुर्द -ना.मा.प्र. , रोवळे-ना.मा.प्र, तळेगाव -ना.मा.प्र.महिला,शेणवली ना.मा.प्र.महिला,मजगाव- ना.मा.प्र.,उसर खुर्द- सर्वसाधारण महिला, काकडशेत -सर्वसाधारण महिला, गिरणे-सर्वसाधारण ,पढवण-सर्वसाधारण, पन्हेळी- सर्वसाधारण महिला, सोनसडे -सर्वसाधारण महिला, भानंग- सर्वसाधारण, वानस्ते सर्वसाधारण, मांदाड- सर्वसाधारण महिला, फळशेत/ कर्नाळा सर्वसाधारण महिला, रहाटाड-सर्वसाधारण, वाशी हवेली -सर्वसाधारण महिला असे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे

## श्रीवर्धन तालुक्यात क्षयरोगमुक्त गावांचा सन्मान

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियान अंतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायतींनी क्षयरोग निर्मूलनासाठी घेतलेले पुढाकार सन्मानित करण्यासाठी दिनांक २२ एप्रिल रोजी पंचायत समिती श्रीवर्धन येथे एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने राबवण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून क्षयरोग निर्मूलनासाठी ग्रामपंचायतींनी केलेल्या कार्याचे कौतुक करत अधिक जोमाने पुढे जाण्याचे आवाहन केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी यांनी मागील काळात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव केला. बारा ग्रामपंचायतींना ब्राँझ मेडल (प्रमाणपत्र व मानचिन्ह) तर सलग दोन वर्षे प्रभावी कामगिरी करणाऱ्या तीन ग्रामपंचायतींना सिल्व्हर मेडल प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील थळे यांनी केले, तर विजय पाटील यांनी क्षयरोग आणि त्याच्या प्रतिबंधाबाबत सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.यानंतर प्रमुख मान्यवरांनी उपस्थित आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक, तालुका समूह संघटक, आरोग्य सेवक आणि सेविका यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामस्तरावर संशयित क्षयरोग रुग्णांचे सर्वेक्षण करून थुंकीचे नमुने तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवावेत. तपासणीत पॉझिटिव्ह रुग्ण आढळल्यास त्वरित औषधोपचार सुरू करावेत, असे स्पष्टपणे सांगण्यात आले.

कार्यक्रमात विविध ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामसभांमधून आरोग्य शिक्षणावर भर देऊन आशा कार्यकर्त्यांना अधिक सक्रिय करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती लवकरच क्षयरोगमुक्त होतील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाची सांगता तालुका आरोग्य सहायक अनंत गायकर आणि आरोग्य सेवक अक्षय धांडे यांच्या मनःपूर्वक आभार प्रदर्शनाने झाली.

# दिल्लीचा विजयी 'षटकार'

## लखनऊवर एकतर्फी मात

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या मंगळवारी झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं लखनऊ सुपरजायंट्सचा एकतर्फी पराभव केला. या सामन्यात केएल राहुलनं त्याच्या जुन्या संघाविरुद्ध शानदार अर्धशतक झळकावलं. त्याच्याशिवाय मुकेश कुमारनं गोलंदाजीतील कौशल्य दाखवलं आणि सर्वाधिक ४ बळी घेतले.

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना लखनऊचा संघ फक्त १५९ धावा करु शकला. प्रत्युत्तरात दिल्लीनं २ विकेट गमावून हे लक्ष्य गाठलं. दिल्लीनं १७.५ षटकांत विजय मिळवला, केएल राहुलनं षटकार मारुन सामना संपवला. दिल्लीनं ८ सामन्यांत सहावा विजय मिळवला आहे. सामन्यात दिल्ली कॅपिटल्ससाठी



सर्वात चांगली गोष्ट म्हणजे त्यांचा कर्णधार अक्षर पटेलनं नाणेफेक जिंकली आणि त्यानं लखनऊच्या खेळपट्टीवर प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लखनऊच्या समस्या इथून सुरु झाल्या, जरी त्यांचे सलामीवीर मार्करम आणि मिशेल मार्श यांनी चांगली सुरुवात करुन दिल्लीला काही ताण दिला. दोघांनी १० षटकांत ८७ धावा जोडल्या. मार्करामनं शानदार अर्धशतक झळकावलं पण ३३ चेंडूत ५२ धावा काढून तो बाद झाला. ही सलामी जोडी तुटताच लखनऊचा संघ मोठ्या अडचणीत सापडला. निकोलस पूरन ९ धावा काढून बाद झाला. अब्दुल समद फक्त २ धावा करु शकला. बदोनीनं २१ चेंडूत ३६ धावा करुन संघाला १५९ धावांपर्यंत पोहोचवलं, पण त्याच्याशिवाय मिलर १५ चेंडूत फक्त १४ धावा करू शकला. पंतनं २ चेंडू खेळले आणि त्याला खातंही उघडता आलं नाही. दिल्लीकडून वेगवान गोलंदाज मुकेश कुमारनं ३३ धावा देऊन ४ बळी घेतले.

दिल्ली कॅपिटल्सना या धावसंख्याचा पाठलाग करताना कोणतीही अडचण आली नाही कारण करुण नायर आणि अभिषेक पोरेल यांनी संघाला जलद सुरुवात दिली.

# दहशतवादी हल्ल्यानंतर क्रिकेटपटूही संतापले!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम इथं २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला, ज्यात २६ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. भारतीय क्रिकेट संघाचे दिग्गज खेळाडूही सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत आहेत.

भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरनं त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर लिहिलं की, मी मृतांच्या कुटुंबियांसाठी प्रार्थना करत आहे. यासाठी पूर्णपणे जबाबदार असलेल्यांना त्याची किंमत चुकवावी लागेल. भारत बदला घेईल. माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगनही पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना शोक व्यक्त केला आणि लिहिलं की, या क्रूर हल्ल्यात जीव गमावलेल्या सर्व कुटुंबांसोबत माझ्या संवेदना आहेत. हे माफ केलं जाऊ शकत नाही.

युवराज सिंगनं लिहिलं, पहलगाममधील पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यामुळं मला खूप



दुःख झालं आहे. मी पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबियांना शक्ती मिळावी यासाठी प्रार्थना करतो. आपण आशा आणि मानवतेमध्ये एकजूट राहूया.

भारतीय संघाचा माजी अष्टपैलू सुरेश रैनानंही याबाबत त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर लिहिलं की, काश्मीरमधील पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामुळं मन दुःखी आहे.पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या या भ्याड कृत्याचा मी तीव्र निषेध करतो. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत आपल्या शूर सैन्या, जम्मू-काश्मीर पोलीस आणि निमलष्करी दलांसोबत एकजुटीनं उभा आहे. न्यायाचा विजय होईल.

भारतीय संघाचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागनं याबाबत लिहिलं की, पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांवर झालेल्या निंदनीय दहशतवादी हल्ल्याची बातमी ऐकून खूप दुःख झालं. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत. जखमींसाठी प्रार्थना करतो.

शिखर धवननंही पोस्ट करत लिहिलं, पहलगाममधील भयानक दहशतवादी हल्ल्यामुळं मी खूप दुःखी आणि धक्कादायक आहे. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्या कुटुंबांसोबत माझ्या संवेदना आहेत. जखमींच्या लवकर बरे होण्याची प्रार्थना करतो. न्याय नक्कीच मिळेल. कृपया सुरक्षित राहा. गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलनं पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल दुःख व्यक्त केलं आणि सोशल मीडिया अकाउंटवर लिहिलं की माझ्या प्रार्थना पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत. अशा हिंसाचारासाठी आपल्या देशात कोणतंही स्थान नाही.

# राज्य क्रिडा पुरस्कार प्राप्त ऋषिकेश मालोरेचा सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील न्हावे गावचे सुपुत्र प्रसिद्ध वकील ॲड.पुंडलिक तुकाराम मालोरे यांचा सुपुत्र ऋषिकेश मालोरे यांना सन २०२३ – २४ यावर्षीचा राज्य सरकारचा श्री शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त झाला असल्याने न्हावे ग्रामस्थ व महिला मंडळातर्फे ऋषिकेशचा जाहीर सत्कार समारंभ शनिवारी (दि.२६) सायंकाळी ६ वा.काळभैरव मंदिर न्हावे येथे राज्याचे रोजगार हमी योजना व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे.

ऋषिकेश मालोरेला शुभेच्छा देण्यासाठी या कार्यक्रमाला मान्यवरांनी तसेच न्हावे गाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी तसेच प्रज्ञा मालोरे, सत्यभामा ढेपे, मालोरे परिवार न्हावे यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास शिवसेना संपर्क प्रमुख अरुण चाळके, शिवसेना जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, शिवसेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, लोणेरे विद्यापीठ कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, शिवसेना महिला जिल्हाप्रमुख



निलीमा घोसाळकर, माणगाव नगरपंचायत माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माणगाव वकील संघटना अध्यक्ष ॲड. मोहन मेथा, शिवसेना तालुका प्रमुख ॲड. महेंद्र मानकर, गोरेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विजय सुर्वे, आई कनकाई सामाजिक संस्था, संस्थापक सुशिल कदम, दत्तात्रय देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष प्रकाश टेंबे, माणगाव पंचायत समिती माजी सदस्य शैलेश भोनकर,माणगाव पंचायत समिती माजी सभापती महेंद्र तेटगुरे,शिवसेना संपर्क प्रमुख प्रताप घोसाळकर,राज्य कर्मचारी संघटना माणगाव अध्यक्ष राजेंद्र खाडे आदी उपस्थित राहणार आहेत.

# मुंबई, हैदराबादचे संघ काळ्या पट्ट्या बांधून उतरले मैदानात!

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

जम्मू–काश्मिरच्या पहलगाम येथे मंगळवारी (दि. २२) झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर बीसीसीआयने बुधवारी होणाऱ्या आयपीएल सामन्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला. २३ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना सुरू झाला तेव्हा दोन्ही संघांच्या कर्णधारांनी या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवला.

सामना सुरू होण्यापूर्वी मुंबईचा कर्णधार पंड्या आणि हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स टॉससाठी आले. मुंबईने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर दोन्ही कर्णधारांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर आपली प्रतिक्रिया दिली.

पंड्या म्हणाला की, 'सर्वप्रथम मी दहशतवादी हल्ल्यातील बळींबद्दल शोक व्यक्त करू इच्छितो. आम्ही एक संघ म्हणून आणि एक फ्रँचायझी म्हणून अशा कोणत्याही हल्ल्यांचा निषेध करतो,' असे सांगितले. तो पुढे म्हणाला, 'टॉस जिंकल्यानतर प्रथम गोलंदाजी करणार आहे. खेळपट्टी चांगला दिसत आहे. आम्ही संघात फक्त एक बदल केला आहे. अश्विनीची जागा विघ्नेश घेईल. खेळ शक्य तितका सोपा करण्याची आमची योजना आहे.'

पॅट कमिन्स म्हणाला, 'पहलगाम दहशतवादी हल्ला ही आमच्यासाठीही खूप दुःखद गोष्ट आहे. आमच्या संवेदना पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत,' अशी भावना त्याने व्यक्त केली. संघात एक बदल करण्यात आल्याचेही त्यांने यावेळी सांगितले. मोहम्मद शमीच्या जागी जयदेव उनाडकटला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले आहे.

# रिषभ आणि जहीर खानमध्ये चालू सामन्यात बाचाबाची

**मुंबई : प्रतिनिधी**

लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स यांच्यामध्ये सामना पार पडला. या स्पर्धेमध्ये दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने लखनौला दुसऱ्यांदा पराभूत केले. कालच्या सामन्यामध्ये रिषभ पंतच्या संघाची निराशाजनक कामगिरी राहिली. फलंदाजांनी त्याचबरोबर गोलंदाजांनीदेखील पखराब कामगिरी केली त्यामुळे संघाला कालच्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. या सामन्यांमध्ये लखनौ सुपर जायंट्सच्या १५९ धावांच्या प्रत्युत्तरात, दिल्ली कॅपिटल्सने आक्रमक सुरुवात केली. युवा अभिषेक पोरेल (५१) ने करुण नायर (१५) सोबत ३.४ षटकांत पहिल्या विकेटसाठी ३६ धावांची भागीदारी केली.

नायर बाद झाल्यानंतर, राहुलने संघाची सूत्रे हाती घेतली



आणि शानदार खेळी करत त्याच्या माजी संघाच्या जबड्यातून विजय हिसकावून घेतला. दिल्लीने लखनौचा ८ गडी राखून पराभव करून चालू सीझनमध्ये आपला सहावा विजय नोंदवला. या सामन्यातील पराभवानंतर ट्रोलर्सनी लखनौचा कर्णधार ऋषभ पंतवर निशाणा साधला. दरम्यान, सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये पंत ७ व्या क्रमांकावर फलंदाजी करण्यापूर्वी डगआउटमध्ये मार्गदर्शक झहीर खानशी वाद घालताना दिसत आहे.

लखनौचा कर्णधार ऋषभ पंतचा फॉर्म इतका खराब आहे की कर्णधार असूनही, मार्गदर्शक झहीर खानने त्याच्यापुढे प्रभावशाली खेळाडू आयुष बदोनीला मैदानात उतरवले. आयुषने २१ चेंडूत ३६ धावा केल्या. जेव्हा आयुष बाद झाला तेव्हा पंतला फक्त दोन चेंडू खेळायचे होते, कर्णधार त्यावर एकही धाव करू शकला नाही आणि तोच जुना शॉट खेळून खाते न उघडता बाद झाला.

# तिरंगी मालिकेसाठी श्रीलंकेकडून महिला क्रिकेट संघ जाहीर



**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या आयपीएल २०२५ चा १८ वा सिझन सुरु आहे, त्यामुळे सर्व क्रिकेट चाहते इंडियन प्रीमियर लीग पाहण्यात व्यस्त आहेत. आयपीएल आधी महिला प्रीमियर लीग पार पडला. यामध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाने आणखी एकदा WPL च्या तिसऱ्या सीझनमध्ये बाजी मारली आहे. आता भारताचा महिला संघ तिरंगी मालिकेसाठी सज्ज झाला आहे. भारताचा हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात टीम इंडिया श्रीलंका दौऱ्यावर असणार आहे.

भारत आणि दक्षिण आफ्रिकेसोबत होणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी श्रीलंकेने १७ सदस्यीय महिला संघाची घोषणा केली आहे. युवा फिरकी गोलंदाज मल्की मदाराला पहिल्यांदाच एकदिवसीय संघात बोलावण्यात आले आहे. किवी संघाविरुद्धच्या टी–२० मालिकेत मदाराची कामगिरी उत्कृष्ट होती आणि त्यामुळेच तो आता ५० षटकांच्या फॉरमॅटमध्येही दाखल झाला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत खेळणाऱ्या श्रीलंकेच्या संघात एकूण आठ बदल करण्यात आले आहेत. ही मालिका २७ एप्रिलपासून सुरू होणार आहे.

श्रीलंकेच्या भूमीवर खेळवल्या जाणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. संघाची कमान चामारी अटापट्टूकडे सोपवण्यात आली आहे. विश्मी गुणरत्ने, निलाक्षी डी सिल्वा, हसिनी परेरा यांचेही संघात पुनरागमन झाले आहे. न्यूझीलंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या मालिकेत श्रीलंकेची कामगिरी निराशाजनक होती आणि एकदिवसीय मालिकेत संघाला २–० ने पराभव स्वीकारावा लागला. यामुळेच संघात अनेक बदल करण्यात आले आहेत. श्रीलंका २७ एप्रिल रोजी टीम इंडियाविरुद्ध मालिकेला सुरुवात करेल. यावर्षी भारतात होणाऱ्या विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर ही मालिका खूप महत्त्वाची मानली जात आहे.+

### मालिकेचे वेळापत्रक

तिरंगी मालिका २७ एप्रिलपासून सुरू होईल आणि पहिल्या सामन्यात हरमनप्रीत आणि कंपनी श्रीलंकेचा सामना करतील. यानंतर, दुसऱ्या सामन्यात टीम इंडिया २९ एप्रिल रोजी दक्षिण आफ्रिकेशी सामना करेल. श्रीलंकेचा सामना २ मे रोजी दक्षिण आफ्रिकेशी होईल. या मालिकेत एकूण ६ सामने खेळले जातील आणि अव्वल दोन संघ ११ मे रोजी होणाऱ्या जेतेपदाच्या सामन्यात खेळतील.

### ट्राई सिरीजसाठी श्रीलंकेचा संघ

चमारी अथापथु (कर्णधार), विश्मी गुणरत्ने, हर्षिता समरविक्रमा, निलाक्षी सिल्वा, कविशा दिलहारी, अनुष्का संजीवनी, हसिनी परेरा, पियुमी वाथ्सला, मनुडी नानायककारा, देउमी विहंगा, इनोका रणवीरा, इनोशी फर्नांडो, मदकारावान, हंसिमा रविक्रमा, मद्दिमा, मल्कारा, सेविका सुगंधिका कुमारी, अचीनी कुलसूरिया

# मॅच फिक्सिंगच्या बाबतीत नवा ट्विस्ट!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ चे ४० सामने पूर्ण झाले आहेत. या कालच्या सामन्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने विजय मिळवून १२ गुण मिळवले आहेत. सध्या इंडियन प्रीमियर लीगचा हा १८ वा सिझन फारच मनोरंजक होत चालला आहे. या सीझनमध्ये अनेक रेकॉर्ड मोडले आहेत त्याचबरोबर या सीझनमध्ये या ४० सामन्यांमध्ये प्रेक्षकांना सुपर ओव्हरचा सामना देखील पाहायला मिळाला होता. आता सध्या राजस्थान रॉयल्सचा संघ चर्चेत आहे. संघाने या सीझनमध्ये फार काही चांगली कामगिरी केली नाही पण सध्या राजस्थान रॉयल्सचा संघ मॅच फिक्सिंगमुळे मोठया प्रमाणात चर्चेत आहे.



राजस्थान रॉयल्सने दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात पराभव पत्करल्यानंतर, संघावर मॅच फिक्सिंगचा आरोप झाला. राजस्थान क्रिकेट असोसिएशनच्या तदर्थ समितीचे निमंत्रक जयदीप बिहाणी यांनी संघावर हा आरोप केला आहे. तथापि, त्यांच्यावरील मॅच फिक्सिंगच्या आरोपांनंतर, राजस्थानने जोरदार प्रत्युत्तर दिले आणि त्यावर आक्षेप घेतला. पण आता एका अहवालात असे म्हटले आहे की आरसीएचे आरोप तिकीट विक्रीमुळे असू शकतात.

एका वृत्तानुसार, आयपीएल २०२५ दरम्यान आरसीएला नेहमीपेक्षा कमी तिकिटे मिळाली आहेत, जी त्यांच्या नाराजीचे खरे कारण असू शकते. अहवालात असा दावा करण्यात आला आहे की राजस्थान रॉयल्सकडून आरसीएला साधारणपणे प्रत्येक सामन्यासाठी सुमारे १,८०० तिकिटे दिली जात होती, परंतु २०२५ मध्ये ही संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली, जिथे त्यांना प्रति सामन्यासाठी फक्त १,०००–१,२०० तिकिटे देण्यात आली.

सूत्रांच्या अहवालानुसार, राजस्थानच्या एका आतल्या सूत्राने सांगितले की, 'सीझनच्या सुरुवातीलाच भारतीय नियामक मंडळाने आम्हाला स्पष्ट सूचना दिल्या होत्या की राजस्थान क्रिकेट असोसिएशन विसर्जित झाल्यामुळे, आम्ही सर्व व्यवस्थांसाठी राजस्थान राज्य क्रीडा परिषदेशी संपर्क साधू असे सांगण्यात आले होते.' राजस्थान रॉयल्सने बिहानी यांनी केलेले आरोप आधीच फेटाळून लावले आहेत आणि आता बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्यानेही आरसीएविरुद्ध आवाज उठवल्याचे वृत्त समोर आले आहे.

### बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांचे वक्तव्य

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, 'आरसीए सध्या विसर्जित झाले आहे. एक तदर्थ समिती स्थापन करण्यात आली आहे आणि निवडणुका जवळ येत असताना बरेच नाट्य घडत आहे. प्रत्येकाला स्वतःकडे लक्ष वेधायचे असते. बीसीसीआयकडे भ्रष्टाचार विरोधी पथक आहे जे वाईट घटकांना खेळापासून दूर ठेवण्यासाठी अहोरात्र काम करते. या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही.

# अलिबागमध्ये जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा


**अलिबाग : प्रतिनिधी**

मार्ग सेवाभावी संस्थेतर्फे सिंधुरत्न करंडक जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ४ मे रोजी चिंतामणराव केळकर विद्यालय, चेंढरे – अलिबाग येथे ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे.

स्पर्धेत विजेत्या संघास रोख रुपये १५००० रुपये व चषक, उपविजेत्या संघास रोख रुपये १०००० रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमाक मिळवणाऱ्या संघास रोख रुपये ५००० रुपये व चषक, शिस्त बद्ध संघास चषक अशी सांघिक बक्षिसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट पकड, उत्कृष्ट चढाई यांच्यासाठी रोख रक्कम व चषक अशी वैयक्ती बक्षिसे देण्यात येणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. प्रथम नोंदणी करणाऱ्या १६ संघाना स्पर्धेत प्रवेश दिला जाईल. स्पर्धेत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल आहे. ४ मे रोजी सायंकाळी ४.०० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होईल. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संघांनी स्पर्धेविषयी अधिक माहिती आणि प्रवेश नोंदणीसाठी प्रकाश सोनवडेकर ९४२११७११७९, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह जे. जे. पाटील ९८२२४२७१०३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नाशिकची कविता 'ज्युनिअर भारत श्री'



**नाशिक : प्रतिनिधी**

आयपीएल स्पर्धेत १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने घरची परिस्थिती हलाखीची असताना जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर क्रिकेट खेळात आपलं अस्तित्व सिद्ध करून दाखवलं. अशीच गोष्ट नाशिकच्या कविता हिची आहे.

घरातील बिकट परिस्थिती असताना स्वतः आईसोबत लोकांची धुणी भांडी करत तिने यशाला गवसणी घातली आहे. नुकत्याच झालेल्या बॉडी बिल्डिंग स्पर्धेत ज्युनिअर भारत श्री हा किताब पटकावून तिने नाशिकचे नाव उंचावले आहे. यावरच न थांबता आंतरराष्ट्रीय बॉडी बिल्डिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मानस कविताने व्यक्त केला असून यासाठी दानशूर व्यक्तींनी तिला मदत करावी, असं आवाहनदेखील तिनं केलं आहे.

मी हार्ड वर्कआउट केलं, डायट केलं आणि स्पर्धेची तयारी केली. आज मी भारत श्री 'किताब पटकावला त्याचा मला अभिमान आहे, असं कवितानं सागितलं.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com